जानेवारी-फेब्रुवारी, ९६

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत नियतकालिक



# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## विश्वस्त मंडळ

श्री. द. म. सुकथनकर

(अध्यक्ष)

श्री. मोहन मो. जयकर

श्री. रमेश दा. सोनी

श्रीमती रेखा ग. दिघे

श्री. प्रकाश व. कारखानीस

श्री. मुकेश र. पटेल

श्री. मधुकर द. जोशी

श्री. प्रकाश पी. वैशंपायन

श्री. मधुकर ज. गर्दे पाटील

श्री. देवकीनंदन सारस्वत

श्री. आप्पासाहेब खं. कोते

श्री. रायभान ग. चिने

श्री. भास्कर शं. बोरावके

श्री. अण्णासाहेब सा. म्हस्के पाटील

श्री. दयालाल हि. पटेल

श्री. राजीव पुं. रोहोम

श्री. संभाजी कि. काळे

श्री. अशोक भि. खांबेकर

सौ. प्रेमाबाई सी. बज

श्री. रामचंद्र नि. गोसावी

श्री. प्रभाकर तु. बोरावके

श्री. सोपान मा. धोर्डे

श्री साईबाबा संस्थान शिरडीचे,
अधिकृत नियतकालिक

# श्री साईलीला

वर्ष ७४ अंक १० - ११

जानेवारी - फेब्रुवारी
१९९६

संपादक
* द. म. सुकथनकर *

कार्यकारी संपादक
* विद्याधर ताठे *

कार्यालय

'साईनिकेतन',
८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई - ४०० ०१४
दूरध्वनी : ४१२२५६१
फॅक्स : (०२२) ४१५०७९८

मुद्रक
गीता ऑफसेट, वडाळा, मुंबई

वार्षिक वर्गणी - रु. ५०/-
आजीव सभासद वर्गणी - रु. १,०००/-
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी - रु. १,०००/-
(टपाल खर्चासहित)
अंकाची किंमत रु. ८/- फक्त

मुद्रक, प्रकाशक द. म. सुकथनकर, अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान शिरडी यांनी हे नियतकालिक, 'साईनिकेत', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०००१४ येथे छापून प्रसिद्ध केले.

या नियतकालिकातील लेखांत प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखातील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मताशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.



श्री साईलीला

## अंतरंग


| | | |
|---|---|---|
| संपादकीय | द. म. सुकथनकर | २ |
| साईप्रचिती | भक्तांचे अनुभव | ४ |
| ज्ञानदेव व ज्ञानेश्वरीचे ध्रुवपद | विद्याधर ताठे | ५ |
| गीतार्थे विश्वभरू | ह.भ.प. विवेकानंद वासकर | १० |
| नामसंगती हवी | प्रा. डॉ. नरेंद्र कुंटे | १५ |
| ॐ नम: शिवाय | स्वामी शिवानंद | १९ |
| विष्णु सहस्त्रनाम | आचार्य विनोबा भावे | २२ |
| अनासक्त व्हा ! | स्वामी विवेकानंद | २६ |
| संत कबीरांची प्रेमदृष्टी | प्रा. टी. के. जाधव | २८ |
| तत: किम् (एक चिंतन) | एस. ए. कुलकर्णी | ३२ |
| काव्यलता | - | ३६ |
| साई बाबांचे प्राणीप्रेम | साईसेविका | ४० |
| ग्रंथ परिचय | विद्यानंद | ४५ |
| अभिप्राय वाचकांचे | - | ४६ |


卐 卐 卐



# संपादकीय

उत्सव व जयंत्या यांचे निमित्त साधून त्या त्या विषयांच्या लेखाद्वारे आपण त्यांचे पुण्यस्मरण केलेले आहे. या कालावधित 'महाशिवरात्र'' येते. त्या दिनी शिर्डी येथे बाबांची पालखी काढून हा उत्सव गेली अनेक वर्षे साजरा होत आहे. महाशिवरात्री निमित्त आपण शिवपुराण व महाशिवरात्रीव्रत विषयक लेख समाविष्ट केलेला आहे. बाबांनी भगवद्‌गीतेचा पुरस्कार केला आहे हे लक्षात घेऊन स्वामी विवेकानंदांचे **''श्रीकृष्ण व येशू''** या अवतारीपुरुषातील साम्य दाखविणारे समन्वयवादी प्रवचन आपण या अंकात घेऊन विवेकानंद जयंतीचे स्मरण केलेले आहे. या अंकाद्वारे ह.भ.प. विवेकानंद वासकर, डॉ. नरेंद्र कुंटे, प्रा. टी. के. जाधव ही मान्यवर लेखक मंडळी श्री साईलीला परिवारातं सहभागी झालेली आहे. श्रीसाई परिवाराचे क्षितीज उत्तरोत्तर विस्तिर्ण होत आहे. चालूवर्ष हे ज्ञानदेवांच्या समाधीचे ७०० वे वर्ष आहे. महाराष्ट्रात त्यानिमित्त अनेक उपक्रम होत आहेत. याच काळात आळंदीत अ.भा. मराठी साहित्य संमेलन होत आहे. संतांच्या ग्रंथरचना-अभंग साहित्य हे मराठी साहित्यातील 'कैलास लेणे' आहे. ज्ञानदेव व ज्ञानेश्वरी यांचे त्यातील स्थान एकमेवाद्वितीय असे आहे. प्रस्तुत अंकापासून आपणही ज्ञानेश्वर-ज्ञानेश्वरीच्या अलौकिकत्वाचे पुण्यस्मरण करणार आहोत. श्री साईनाथ स्तवनमंजिरीमध्ये श्री साईबाबांचे वर्णन करताना साईभक्त संतकवि दासगणू म्हणतात -

**तूच सद्‌गुरु मच्छिंदर । तूच महात्मा जालंदर ।**
**तूं निवृत्तिनाथ ज्ञानेश्वर । कबीर शेख नाथ तूं ॥**

चराचरात भरून उरलेल्या व्यापक ईशतत्त्वाचा श्रीसाईबाबा हे अवतार आहेत. त्यामुळे कोणाही संतांचे-संतवचनांचे स्मरण हे श्रीसाईस्मरण आहे असे मला वाटते.

हे नववर्ष श्री साईबाबांच्या कृपाप्रसादाने आपणास सुखासमाधानाचे आनंदाचे जावो ही पुन:श्च एकदा शुभेच्छा.

**द. म. सुकथनकर**



# श्रीसाई प्रचिती

## भक्तांचे अनुभव



धनत्रयोदशीचा दिवस होता. दिवाळीच्या सणासाठी मला पैशांची अतिशयच जरुरी होती. मी करीत असलेला रोजचा माझा लोकलमधील विक्री आज कितपत चालेल याचीच मला मोठी भ्रांत होती. मी त्या दिवशी अगदी मनापासून साईबाबांना सांगितले की; बाबा आज माझी विक्री उत्तम प्रकारे होऊ दे! मी त्या दिवशी स्टेशनांत आलेल्या पहिल्याच लोकलमध्ये चढले व विक्री चालू करण्यास सुरुवात केली. आश्चर्य असें कीं; मी त्या दिवशी विक्रीस आणलेला भाकरवडीचा माल अगदी व्हि. टी. स्टेशन येईपर्यंत कसा संपला ते मला मुळींच समजले सुद्धा नाही. यावेळी मला खूपच पैसे मिळाले व त्यामुळे माझे मनास समाधान वाटून खूपच आनंद झाला. यामुळेंच मी या सणांत घरांतील सर्वांस विशेष करून माझ्या आईला नवीन कपडे देऊन फारच खूष व आनंदीत करू शकले. साई बाबांनी माझी करूण कहाणी ऐकून मला जो अनपेक्षितपणे मदतीचा हात देऊन मानसिक समाधान दिले त्यामुळे बाबाचे माझ्यावर अनंत उपकार झाले आहेत यात शंकाच नाही.

**– सौ. ताकभाते (डोंबिवली)**

माझ्या मुलाचे ह्या वर्षी केंद्रीय विद्यावयामध्ये ॲडमीशन होत नव्हते. मी दोन महिने खूप फिरलो. परंतू कुणाच्याच ओळखीचा ॲडमीशन साठी फायदा होत नव्हता. मी प्रिन्सीपॉलला खूप विनंती केली तरी काही माझे काम होईना. यावेळेस मला बाबांच्या 'श्रद्धा आणि सबुरी'' या उक्तीचा खुप अनुभव आला.

प्रिन्सीपॉल मला बदलीशिवाय मुलाला शाळेत प्रवेश मिळणार नाही असे सांगत असे. तरी मला विश्वास होता की काहीही झाले तरी बाबांच्याकृपेमुळे आपले काम होणारच आणि मी ॲडमीशनच्या शेवटच्या दिवशी मी शाळेत जाऊन पाहतो तो काय चमत्कार, माझ्या मुलाचे शाळेच्या ॲडमीशनसाठीच्या यादीत नाव होते. बाबांनी असा काही चमत्कार घडवून आणला की मी एकदम भावनाविवश झालो. मी प्रिन्सीपॉलला जाऊन भेटलो व मुलाचे यादीतील नाव सांगितले तेव्हा प्रिन्सीपॉलनेही जादा चौकशी न करता. मला मुलासाठी ॲडमीशन घेण्यास सांगितले व मी त्याच दिवशी लगेचच ॲडमीशन घेऊन टाकले व माझा मुलगा आता व्यवस्थित रेग्युलर शाळेत जात आहे. हे सर्व बाबांच्या कृपेमुळेच साध्य झाले आहे.

**– के. डी. गुंजाळ (पुणे)**

मे महिन्यातील दुपारची वेळ होती. गुरवारचा उपवास असून त्याच दिवशी संकष्टी होती, घरांतील देवांची पूजा-अर्चा झालेली होती. घरांतील मंडळी कामावर गेली होती. संकष्टी आणि त्याच दिवशी गुरूवार असल्यामुळे 'त्या दिवशी जेवण दुपारी बनवण्याचे काम नव्हते.

एवढ्यात दारांवरील बेल वाजली. म्हणून मी दरवाजा उघडला. त्यावेळी दुपारचे १२ वाजले होते. एक १४ ते १५ वर्षांचा मुलगा आणि त्याच्या पाठोपाठ वाचमन ओरडतच आला. ''बिना पुछे तुम अंदर आया और सिधा उपर जाता है'' 'तुम कौन है कुछ बोलता भी नहीं' असे वॉचमन त्याला बोलला.

मला तर काहीच समजेना, अंगावर फाटके कपडे मळलेले तसेच हातात एक फाटकीशी पिशवी होती पण मूर्तिमंत तेज चेहऱ्यावरच असलेला 'तो' मुलगा आमच्या खोलीत शिरला आणि खुर्चित बसला. माझ्याकडे बघून खळखळून हसला आणि मला म्हणाला, 'मला शिरडीच्या साईंची 'उदी' कागदात बांधून द्या'' आणि तुमच्या साईलीला संग्रहातील २ साईलीला अंक घरि नेण्यासाठी घ्या शिवाय तुम्ही वाजता 'ती' हेमाडपंत लिखीत साई-चरित्र पोथी माझ्या हातात घ्या 'मला' ती पहायची आहे.

वरिल सर्व संभाषण ऐकून मी अगदी आश्चर्यचकित झाले. ह्या मुलाला ह्या सर्व वस्तु माझ्याकडे आहेत हे समजले कसे?

त्या मुलाने मागितलेल्या सर्व वस्तु मी त्याला दिल्या पण साईंची पोथी मी त्याला बघायला दिली नाही. कारण एकदा पुजा झाली की मी देवघरांतील पोथीला हात लावत नाही असे सांगितले. त्यावर तो मुलगा म्हणाला आनंद आहे. 'जर तुमची' त्या पोथीवर एवढी श्रद्धा आहे तर मला पहायला नका देऊ.'

गुरवार-संकष्टी माझा आज उपवास आहे (तोपर्यंत वाचमन खोलीत बसूनच होता) असे बोलला.

नंतर खूर्चितून चटकन उठला आणि 'मी' आता जातो' माझे नाव साईनाथ मी मालवणीतील कांदळ गांवास मोठा डोंगर आहे, त्या डोंगरावर मोठे आंब्याचे झाड आहे. 'त्या' झाडांखाली मी राहतो असे बोलला आणि म्हणाला 'ताई, तुला मी पत्र पाठविन.'

नंतर वॉचमन मागे 'तो' मुलगा पुढे लिफ्टमधून खाली गेले. थोडेसे अंतर रस्त्यापर्यंत चालताना पाहीले आणि ती बाल मुर्ति कुठे अद्रिव्य झाली काहींच समजले नाही. तेव्हांपासून साई भाऊ – तुझ्या पत्राची वाट मी पहाते.

साई भक्तानं अशी ही साई माऊली 'केव्हा, कुठे, कोणत्या वेषात कशी प्रकटेल हे तुम्हा-आम्हाला कुणालाच समजणार नाही.

**– सौ. राणे (भांडुप)**

नामा परते तत्त्व नाही रे अन्यथा ।



# ज्ञानदेव व ज्ञानेश्वरीचे ध्रुवपद

विद्याधर ताठे
(कार्यकारी संपादक श्री साईलीला)

संत ज्ञानदेव व त्यांची ज्ञानेश्वरी यांना एकाच वेळी 'माऊली' असे म्हटले जाते. ज्ञानदेव व ज्ञानेश्वरीस प्राप्त झालेले हे ध्रुवपद अलौकिक, अनुपम व अनन्यसाधारण असे आहे. समकालिन संत चाखोबा ते अर्वाचित संत विनोबा पर्यंत सर्वांनीच ज्ञानदेवांना मोठ्या कृतज्ञभावाने वंदन केलेले आहे. काळावर मात करीत ज्ञानदेव व ज्ञानेश्वरी मराठी मनावर गेली ७०० वर्षे अधिराज्य गाजवित आहे त्यांच्या प्रभावाचे क्षितीज दिवसेंदिवस विस्तिर्ण होत असून अवघ्या मानव समाजाला ते व्यापून टाकणार आहे असे दिसते. ज्ञानदेवांच्या संजीवन समाधीचे हे सप्त शताब्दी वर्ष आहे, आपण त्यांच्या कार्याचे पुण्यस्मरण करून ते वर्षभर साजरे करू या.

'गेली सातशे वर्षे संत ज्ञानदेवांची वाणी महाराष्ट्राच्या कानामनाला रिझवित आहे. 'अवघाचि संसार सुखाचा करीन' हे आपले प्रतिज्ञोत्तर त्यांनी अक्षरश: खरे करून हे तिन्ही लोक आनंदाने भरून टाकले आहेत, यात तिळमात्र शंका नाही' संतसहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक-संशोधक डॉ. शं.गो.तुळपुळे यांनी संत ज्ञानदेवांच्या एकूण कार्याचे वरील शब्दात वर्णन केले असून त्यावरून ज्ञानदेवांच्या कार्याची महती लक्षात येण्यासारखी आहे.

संत ज्ञानदेवांचे समकालिन संत नामदेव महाराज संत चोखोमेळा, संत तुकाराम, संत निळोबा एवढेच नव्हे तर अर्वाचिन संत विनोबा भावे गुरुदेव रानडे आदी अत्यंत समर्पक शब्दात व मोठ्या कृतज्ञभावाने ज्ञानदेव कार्याचे पोवाडे गायलेले आहेत. या सर्वांनीच लक्षावधी वारकऱ्याप्रमाणे एकमुखाने ज्ञानेश्वरी ग्रंथास व खुद्द ज्ञानेश्वरांना एकाच वेळी 'माऊली' म्हणून गौरवलेले आहे. ग्रंथकर्ता व त्याच्या ग्रंथास असा सन्मान लाभलेले आहे. ग्रंथकर्ता व त्याच्या असा सन्मान लाभलेले जगाच्या पाठीवर ज्ञानदेव हे एकमेव असावेत

**ज्ञानराज माझी योग्याची माऊली।**
**जेणे निगमवल्ली प्रगट केली ॥**

**संत नामदेव**

**ते हे माय ज्ञानेश्वरी ।**
**संतजना माहेश्वरी ॥**

**- संत जनाबाई**

**धन्य कान्होपात्रा आजि झाली भाग्याची ।**
**भेटी झाली ज्ञानदेवाची म्हणोनिया ॥**

**- संत कान्होपात्रा**

**सुख अनुपम्य संताचे चरणी ।**
**प्रत्यक्ष अलंकाभुवनी नांदतसे ॥**
**तो हा महाराज ज्ञानेश्वर माऊली।**
**जेणे निगमवल्ली प्रगट केली॥**

**- संत चोखा मेळा**

**ज्ञानदेवाचे नित्यनाम घेती वाचे ।**
**उद्धरती तयाची सकळ कुळे ॥**

**- संतसेना महाराज**

**कृपाळू उदार माझा ज्ञानेश्वर ।**
**तया नमस्कार वारंवार ॥**
**न पाहे याती कुळाचा विचार ।**
**भक्त करूणाकर ज्ञानाबाई ॥**

**- संत एकनाथ**

**ज्ञानियांचा राजा गुरू महाराज ॥**
**म्हणती ज्ञानदेव तुम्हा ऐसे ॥**

**- संत तुकाराम**

वरील पैकी संत नामदेव-जनाबाई-चोखामेळा आदी ज्ञानदेव समकालिन असून संत एकनाथ व संत तुकाराम हे उत्तर काळातील आहेत. हे सर्व संत आत्मसाक्षात्कारी आहेत. त्यामुळे त्यांनी केलेले ज्ञानदेवांचे गुणवर्णन इतर कोणांपेक्षाही अधिक समर्पक ठरते. थोर विभूतीची उंची मोजण्यास तशाच तोलामोलाची व्यक्ती लागते. हे लक्षात घेता वरील संतांनी गायलेली ज्ञानेश्वर महती ज्ञानेवांच्या ठायी वसत असलेल्या दिव्यत्वाचीच साक्ष आहे. १८ पगड जातीतील जनांमध्ये नामभक्तीच्या अमृतसिंचनाने भजनत्व निर्माण करून अशा भजन करणाऱ्या सुजनांचे संघटन चंद्रभागेच्या वाळवंटात, भागवतध्वजेखाली करून पारमार्थिक समतेचे, स्वप्नवत वाटणारे समाजपरिवर्तन, ज्ञानदेवांनी आपल्या अल्पशा २२ वर्षाच्या अल्पायुष्यात पूर्ण केले. 'न भूतो' असे हे कार्य ज्ञानदेवांनी कोणत्याही संघर्षाशिवाय केले होते, हेही त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य आहे.

**तैसे नामे केले जपता हरि**

हरि उच्चारणी अनंत पापराशी।
जातील लयासी क्षणमात्रे ॥१॥
तृण अग्नि मेळे समरस झाले।
तैसे नामे केले जपता हरि ॥२॥
हरिउच्चारण मंत्र पै अगाध ।
पळे भूतबाधा भेणे तेथे ॥३॥
ज्ञानदेव म्हणे हरि माझा समर्थ
न करवे अर्थ उपनिषदा ॥४॥

## नामाला वेदमंत्राचे सामर्थ्य

वेदवंचित समाजातील सुजनांना नाममंत्राचे प्रभावी साधन देऊन ज्ञानदेवांनी त्यांच्या ठायी आत्मविश्वास निर्माण केला. ईश्वरप्राप्तीची तत्कालीन प्रमुख साधने योग व याग यांना त्यांनी त्याज्य ठरवून 'योग याग विधी येणे नोहे सिद्धी ।' हे वचन जनमानसात ठसविले आणि त्याचबरोबर **'नामा परते तत्त्व नाही रे अन्यथा'** असे नामाला तत्त्वाचे अधिष्ठान दिले. नामाचे सामर्थ्य लोकांना पटावे म्हणून वाल्मिक ऋषींचा दृष्टांत लोकांपुढे ठेवला.

**पुराण प्रसिद्ध बोलिले वाल्मिक । नामे तिन्ही लोक उद्धारती॥**

अशा प्रकारे नामात तिन्ही लोक उद्धरण्याचे अचाट सामर्थ्य आहे हे त्यांनी वेगवेगळ्या अभंगातून आणि विशेषत: ''हरिपाठ' या रचनेतून विशद केले. ज्ञानेश्वरी मध्येही त्यांनी गीता निरूपण करता करताच नामघोषाचे-नामस्मरणाचे महत्त्व सांगितलेले आहे.

**ऐसे माझेनि नामघोषे ।**
**नाही करिती विश्वाची दु:खे ।**
**अवघे जगचि महासुखे**
**दुमदुमित भरले ॥**

**- ज्ञानेश्वरी**

परमेश्वराचा नामघोष विश्वाची दु:खे नष्ट करून सारे जग महासुखाने दुमदुमून टाकतो. हे अर्जुना मी (ईश्वर) वैकुंठात नसेन, सूर्यबिंबाच्या ठायीसुद्धा नसेन, तसेच योग्याच्या मनातही नसेन, पण जेथे माझा नामघोष चालू आहे तेथे मात्र मी निश्चित सापडतो. असे कृष्णउपदेशाद्वारे कथन करून ज्ञानदेव वेदवंचित समाजामध्ये नामाला वेदमंत्राएवढी प्रतिष्ठा व विश्वास संपादन करण्याची किमया करतात. नामाला असे अनन्य साधारण स्थान व मान ते वारकरी संप्रदायात मिळवून देतात की हा संप्रदायच **'नामधारकांचा संप्रदाय'** म्हणून सर्वत्र लोकमान्य होतो.

**एक तत्त्व नाम दृढ धरी मना ।**
हरिसी करूणा येईल तुझी ॥१॥
ते नाम सोपे रे रामकृष्ण गोविंद ।
वाचेसी सद्‌गद्‌जपा आधी ॥२॥
नामा परते तत्त्व नाही रे अन्यथा ।
वाया आणिक पंथा जाशी झणी ॥३॥
ज्ञानदेव मौन जपमाळ अंतरी ।
धरोनी श्रीहरी जपे सदा ॥४॥

## ७०० वर्षे प्रभाव टिकून

ज्ञानदेवांच्या या निरुपणाचा तत्कालिन समाजावर जो विलक्षण प्रभाव पडला तो १८ पगड जातीत जन्मलेल्या अगणित संतांच्या रुपाने आपणास प्रत्यक्षच पाहण्यास मिळतो. ज्ञानदेवांचा प्रभाव आज ७०० वर्षे झाली तरी अगदी तसाच टिकून आहे. चालू शतकात झालेले संत विनोबा भावे यांच्यावरील ज्ञानदेवांचा प्रभावही असाच विलक्षण आहे. विनोबा म्हणतात, - **'ज्ञानदेवांचा माझ्यावर जो उपकार झाला आहे तो वर्णन करण्यास माझ्याजवळ शब्द नाहीत. तो माझ्या चिंतनावर आहे, हृदयावर आहे, आणि माझ्या कार्यपद्धतीवर आहे.'** केवळ नाममहिमा प्रतिपादन करण्यासाठी ज्ञानदेवांनी २८ अभंगाचा 'हरिपाठ' लिहिला त्या हरिपाठाबद्दल विनोबा म्हणतात - **'ज्ञानदेवांचा हरिपाठ ही त्यांची सर्व लोकांना देणगी आहे. ज्ञानदेवांचा शब्द वाचल्याशिवाय महाराष्ट्राला गती नाही, अशी आज स्थिती आहे. ज्ञानेश्वरी बद्दल बोलायचे तर मराठी भाषेतून ज्ञानेश्वरीवजा केली तर ज्ञानेश्वरी वजा मराठी भाषा शून्य आहे असेच लिहावे लागेल.'**

ज्ञानदेवांच्या कार्याचे अर्वाचिन संत विनोबा भावेंप्रमाणेच आणखीन एका अर्वाचिन साक्षात्कारी संताने मोठ्या चिकित्सकपणे गुणवर्णन केलेले आहे. हे साक्षात्कारी संत म्हणजे गुरूदेव रानडे. गुरूदेव केवळ संतच नव्हते तर पाश्चात्य व पौर्वात्य तत्त्वज्ञानाचे व्यासंगी अधिकारी अभ्यासक होते. त्यांनी देशोदेशीचे विविध ग्रंथ अभ्यासल्यानंतर ते म्हणतात - **'ज्ञानेश्वरीतल्या प्रमाणे नीति-मिमांसा पाश्चात्य ग्रंथातून क्वचितच आढळते. भाषासौंदर्य, तत्त्वज्ञान, साक्षात्कार, भक्ती व अद्वैत यांची सांगड, अलौकिक निरीक्षणशक्ती अप्रतिहत, कवित्वशैली, अलोट वाङ्मयमाधुर्य या सर्व गुणांच्या संमिश्रणाने असा ग्रंथ 'न भुतो न भविष्यती' झाला नाही होणार नाही असे म्हणण्यास हरकत नाही.'** गुरूदेव केवळ एवढेच म्हणून थांबत नाहीत, तर पुढे म्हणतात - **'अनुभव-काव्य व तत्त्वज्ञान या तिन्ही दृष्टींनी पाहिले असता, मराठी भाषेत आजपर्यंत ज्ञानेश्वरीसारखा ग्रंथ झाला नाही व इतर कोणत्याही भाषेत झाला आहे किंवा नाही याबद्दल शंकाच आहे.''**

संत विनोबा भावे, गुरूदवे रानडे यांच्या प्रमाणेच प्रिन्सीपॉल शं. वा. दांडेकर हेही एक अर्वाचिन साक्षात्कारी सत्पुरुष होऊन गेले. तेही तत्त्वज्ञानाचे व विशेषत: पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचे चिंतनशिल अभ्यासक होते. त्यांनी प्लेटोच्या साहित्याशी ज्ञानदेवांची तुलना करून ज्ञानदेव अनेक बाबतीत प्लेटोपेक्षाही कसे श्रेष्ठ व सरस होते हे सप्रमाण पटवून दिलेले आहे. ज्ञानेश्वरीबद्दल ते म्हणतात -

**ज्ञानेश्वरीत कर्म आहे पण कर्माची कटकट नाही, ज्ञान आहे पण ज्ञानाचा रुक्षपणा नाही आणि भक्ती आहे पण ती भोळ्या अज्ञानाची नाही. त्यांनी तत्त्वज्ञानाला प्रेमाची माधुरी आणली व भक्तीला ज्ञानाचा डोळा दिला.'**

## आंग्ल विद्याविभूषितांनाही वंदनीय

समकालिन संत, उत्तरकालिन संत व अर्वाचिन संतांनी केलेला संत ज्ञानदेवांचा कार्यगौरव आपण पाहिला, आता विद्यापीठांमध्ये उच्च विद्याविभूषित - संशोधक म्हणून अध्यापन करणाऱ्यांचे ज्ञानदेवांबद्दल त्यांच्या ज्ञानेश्वरीबद्दलचे मत पाहू. आंग्ल नाटककार शेक्सपिअर यांच्या नाटकामध्ये रममाण झालेले प्रा. पटवर्धन हे फर्गसन महाविद्यालयातील जुन्या काळातील एक मान्यवर प्रोफेसर. ते म्हणतात - ज्ञानेश्वरी ही मराठी वाङमयात अप्रतिम आहे, ती अतीव कोमल आहे, नितांत सुंदर आहे, उपमा व रूपक, दृष्टांत व दाखले देण्यात तिची कल्पकता पराकोटीची आहे आणि तिची भाषाशैली अत्यंत स्पष्ट व सुबोध आहे. तिच्या कल्पनेच्या भराऱ्या इतक्या उत्तुंग आहेत, तिच्या भावना इतक्या उदात्त आहेत, तिचे पद-लालित्य इतके मंजुळ आहे, तिचे विचार इतके स्वतंत्र आहेत आणि तिची अभिरुची इतकी शुद्ध आहे की तिच्या विषयाचे स्वरूप गहन गंभीर असले तरी ज्ञानेश्वरी वाचताना वाचक मुग्ध होऊन जातो, तिच्या प्रवाहाच्या लाटेवर हर्षभराने तरंगू लागतो आणि लयीच्यातालात व सूचक स्वर-माधुर्यात बुडून जातो आणि मग विचार असा शिल्लकच रहात नाही - सर्व काही धन्य ! धन्य ! वाटत रहाते'' साधारणत: आंग्ल उच्चविद्याविभूषित विद्वान म्हटले की तो पाश्चात्त्य साहित्य व विचाराने इतका प्रभावित झालेला असतो की त्याला ऐतदेशिय कोणतीच गोष्ट सत्त्वसंपन्न वाटत नसते. मात्र ज्ञानदेवांचे साहित्य यास अपवाद ठरले; अनेक आंग्लशिक्षित विद्वानांच्या प्रशंसेचे भाग्य ज्ञानदेव व ज्ञानेश्वरीला लाभले.

### अनंत जन्माचे तप एक नाम

नामसंकीर्तन वैष्णवाची जोडी ।
पापे अनंत कोटी गेली त्यांची ॥१॥
अनंत जन्माचे तप एक नाम ।
सर्व मार्ग सुगम हरिपाठ ॥२॥
योग याग क्रिया धर्माधर्म माया।
गेले ते विलया हरिपाठी ॥३॥
ज्ञानदेवी यज्ञ याग क्रिया धर्म।
हरिवीण नेम नाही दुजा ॥४॥

## विश्वरूप ओवी

ज्ञानदेवांनी मराठी भाषेला तिच्या उगम त्यांनीच असा अनुपम अद्वितीय काव्यग्रंथ दिला की असा असामान्य दर्जाचा उच्च कोटीचा ग्रंथ क्वचितच कोण्या भाषेच्या आरंभ काळी तिला लाभला असेल. विनोबा याबद्दल म्हणतात - **''आमच्या मराठी साहित्याच्या उगमस्थानी इतके मार्दव आहे ही फार मोठी आनंदाची गोष्ट आहे आणि म्हणाल तर ती अभिमानाचीही गोष्ट आहे.''** ज्ञानदेवांनी मराठी भाषेला दिलेली ओवी म्हणजे संजिवनीच आहे. त्या ओवीचे गावे तेव्हढे महात्म्य थोडे आहे. ज्येष्ठ विचारवंत दा.न.शिखरेच्या शब्दात ते असे आहे :- ओवी अत्यंत साधी पण ज्ञानदेवांनी तिच्यामध्ये प्राण फुंकला. त्यामुळे ती ओवी सजीव झाली. वाचकांना सजीव करू लागली. ती महाराष्ट्रातील घराघरात हिंडू लागली - बायकापोरांशी बोलू लागली. माळ्यासाळ्याच्या आणि कुंभार लोहाराच्या जिभेवर नाचू लागली. मोटेवर व जात्यावर ती ऐकू येऊ लागली - आणि गेली अनेक शतके ती मराठी भाषिकांची जीव की प्रमाण बनून गेली. ज्ञानेश्वर हे महाराष्ट्राचे 'माऊली' च बनले.


**हे विश्वचि माझे घर। ऐसी मती जयाची स्थिर ।**
**किंबहुना चराचर। आपण जाहला ॥** **ज्ञानेश्वरी**

या त्यांच्या एका ओवीत काय नाही? या लघुवृत्तात अध्यात्माचे विश्वरूप साठविलेले नाही काय? तिच्यात प्रसाद आहे आणि प्रचीतिही आहे.

अनेक मान्यवर साहित्यिकांनीही ज्ञानदेवांच्या वाणीवर स्तुतीसुमने उधळलेले आहेत. लोकमान्य टिळकांच्या 'केसरी' चे संपादक व साहित्यसम्राट श्री. न.चि. केळकर म्हणतात - 'विसाव्या शतकातही कवित्वाच्या दृष्टिने ज्ञानेश्वरीच अजिंक्यपत्र मिळवील यात शंका नाही. उपमा व दृष्टांत यात ज्ञानेश्वरांचा हात धरणारा कवि मराठीत झाला नाही असे म्हणता येईल. अलंकार-वैभवाची श्रीमंती आजवर दुसऱ्या कोणत्याही मराठी-कदाचित संस्कृतही कवीच्या वाट्याला आलेली नाही.''

ज्ञानदेव व ज्ञानेश्वरीला ७०० वर्षे झालेली आहेत. या ७०० वर्षांत अनेक राजे आले गेले, अनेक राजवटी

श्री क्षेत्र आळंदी येथील संत ज्ञानदेवांची
संजीवन समाधी



नांदल्या; लोकांच्या आवडी-निवडी बदलल्या, जीवनमान- राहणीमानात परिवर्तने झाली, नवे नवे साहित्य आले व अल्पावधीतच विस्मृतीच्या अंधारात गडप झाले, साहित्याचे निकष व परिमाणे बदलत गेली पण या साऱ्या परिवर्तनामध्ये ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरी यांचे जनमानसातील 'माऊली' पद मात्र ध्रुव ताऱ्यासारखे अढळ राहिलेले आहे. हाच ज्ञानदेव-ज्ञानेश्वरीचा चमत्कार आहे. चमत्कार म्हटला की अनेक विज्ञानवादी विद्वानांच्या कपाळाला आठ्या पडतात. चमत्कार म्हणजे अंधश्रद्धा असे त्याचे समीकरण असते. पण जगात अनेक घटना अशा असतात की त्याची कार्यकारण मिमांसा प्रयोगशाळेत सिद्ध करता येत नसते. हे त्यांना मान्य नसते. प्रयोगशाळेत ज्याची कार्यकारण मिमांसा सिद्ध करता येत नाही तरीही सत्य म्हणून ज्या नाकारता येत नाहीत अशा अतर्क्य घटनांना चमत्कार म्हणतात. आज ज्या गोष्टी चमत्कार वाटतात, त्या उद्या कार्यकारण भाव समजताच विज्ञानात समाविष्ट होत असतात. त्यामुळे अतर्क्य वाटणाऱ्या घटनांना अंधश्रद्धा म्हणून त्यावर हल्ला करणे निषेध करण्यापेक्षा विज्ञाननिष्ठांनी त्या घटनांमागील अज्ञात तत्त्व - अज्ञातकार्यकारण भाव शोधू काढण्याचे प्रयत्न करावेत असे वाटते. ज्ञानदेवांच्या संजीवन समाधीचे हे ७०० वे वर्ष असून या मुहूर्तावर विज्ञाननिष्ठांना उदार विधायक दृष्टी लाभो हीच प्रार्थना.

**ज्ञानदेव म्हणे नाम जपा हरिचे ।**

त्रिवेणी संगमी नाना तीर्थभ्रमी ।
चित्त नाही नामी तरी ते व्यर्थ ॥१॥
नामासी विन्मुख तो नर पापीया ।
हरिवीण धावया न पावे कोणी ॥२॥
पुराण प्रसिद्ध बोलिले वाल्मिक।
नामे तिन्ही लोक उद्धरति ॥३॥
ज्ञानदेव म्हणे नाम जपा हरिचे ।
परंपरा त्याचे कुळ शुद्ध ॥४॥

卐 卐 卐



# गीतार्थे विश्व भरू !

ह.भ.प.विवेकानंद वासकर महाराज

> ज्ञानदेवाच्या वाङ्मयातून त्यांचे विश्वरुप प्रकट होते. इंद्रिय आणि त्याचे विषय विभिन्न असले तरी ज्ञानदेवांच्या शब्दांना नादाचे माधुर्य आहे. अमृतासारखी रसाळ चव आहे. माऊलीच्या मायेने कुरवाळणारा प्रेमळ स्पर्श आहे. अरुपाचा रुप दाखविणारे दर्शनसुख आहे. ''सोनया जोडले सौरभ्य जैसे'' याची अनुभूती देणारा गंध आहे. ''इंद्रिया लागे कळंबा एकमेका'' असा सर्वेंद्रियांना आकर्षिणारा, सुख देणारा ग्रंथ ज्ञानेश्वरी ही ज्ञानदेवाची वाङ्मयीन मूर्तीच आहे.

''गीता जाणा ही वाङ्मयी श्रीमूर्ती प्रभूची'' या उक्तिप्रमाणे श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या व्यक्तित्व व व्यक्तिमत्वाचा मागोवा घ्यावयाचा झाल्यास श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या वाङ्मयामध्ये त्यांचे विश्वरूप दिसल्याशिवाय रहात नाही. कुंडलिनी जागृत झालेला महाकैवल्य तेजाचा हटयोगी खरा की सगुण भक्तिचा बाराव्या अध्यायातील भक्तिचा उदगाता खरा ? कर्म, ज्ञान व उपासना या वेद प्रतिपाद्य विषयाला एकाच बैठकीवर आणणारा तेरावा दर्शनकार खरा कि अलौकिक प्रतिभासंपन्न क्रांतदर्शी कवि खरा ? निर्गुणाच्या प्रांगणामध्ये वावरणारा ''मोक्षमार्गाचा सांगाती खरा कि 'माझ्या जिवीची आवडी । पंढरपुरा नेईन गुडी ॥'' असा पंढरीचा वारकरी खरा ? चिद्‌विलासाचे अलौकिक तत्वज्ञान सांगणारा खरा कि पंढरीरायाचा वेध लागलेला विरहिणीकर्ता खरा ? अशा विविध शंका एकाच व्यक्तिमत्वातून प्रगट होतात आणि त्यामध्येच श्री ज्ञानेश्वर माऊलींचे वैशिष्ट्य सामावलेले आहे या व्यक्तिमत्वाचा प्रत्येक पैलू हा पूर्णतेला पोहोचलेला आहे. श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या व्यक्तिमत्वामध्ये एकच उणीव

मला वाटते ती म्हणजे त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या प्रत्येक पैलूला कुठल्याही उणीवांचा स्पर्श झालेला नाही. अगदी दृष्ट लागू नये म्हणून लौकिक जीवनामध्ये सुंदर मुखकमलावर आपण काळा टीक लावतो. तसा कोणताही काळा टीक त्यांच्या लौकिक, अलौकिक, संसारी वा पारमार्थिक जीवनामध्ये आढळत नाही.

शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध हे पाच विषय सर्व जगाच्या लौकिक व पारमार्थिक क्षेत्रांमध्ये मानलेले आहेत. व हे पाच विषय उपभोगण्यासाठी जीवाजवळ पंच ज्ञानेंद्रिये, पंच कर्मेंद्रिये व अंतःकरण अशी अकरा इंद्रिये मिळालेली आहेत. इंद्रिय या विषयाचे एक वैशिष्टच म्हणजे प्रत्येक इंद्रियाचा विषय हा वेगळा असतो. उदाहरणार्थ रस हा विषय रसनेचा आहे. तो कानाचा, त्वचेचा वा डोळ्याचा विषय होऊ शकत नाही. त्याप्रमाणे एखाद्या गवयाचे गाणे कान या इंद्रियाला तृप्त करेल. परंतु ते रसनेला वा डोळ्याला सुखी करू शकत नाही. उलट काही काही गवयी गाताना एवढे तोंड वेडेवाकडे करतात कि ऐकणारा डोळे झाकून घेतो. म्हणजे इंद्रिय व त्याचे विषय हे ठरलेले आहेत. परंतु श्री ज्ञानेश्वर महाराजांचे वाङ्मय एकाच वेळी सर्व इंद्रियांना सर्व विषय देऊन सुखाऊन जाते. हा अतिशयोक्तिचा भाग नसून ही वस्तुस्थिती आहे.

१. **''साच आणि मवाळ । मितुले आणि रसाळ ।**
**शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे ॥''**

इथे रसना अपुरी पडते.

२. श्री माऊलीच्या शब्दाला एक सुंदर नाद आहे. ती अक्षरे उच्चारल्याबरोबरच त्यातून संगीत बाहेर पडते. अशीच एक नादाची ओवी अठराव्या अध्यायामध्ये आलेली आहे -

**''मग तो सावळा सकंकणु । बाहु पसरोनि दक्षिणु ।**
**अलिंगला स्वशरणु । भक्तराजु तो ॥''**

यातील 'सकंकणु' हा शब्द उच्चारल्याबरोबर अर्जुनाला मिठी घालताना कृष्णाच्या उजव्या हातातील सुवर्ण कंकणाचा आवाज (नाद) श्रोत्याला आल्यावाचून रहात नाही.

३. प्रत्येक जीवाला लहानपणी आपल्या आईने कुरवाळल्याचा स्पर्श आठवतोच, परंतु नऊ हजार ओव्यातून या विश्वमाऊलीने आपल्या विविध व्यक्तिरूपांनी जीवाला जो स्पर्श केला आहे. तो कुठल्याही साहित्यामध्ये किंवा तत्वज्ञानामध्ये दिसून येत नाही. आणि म्हणूनच तेराव्या अध्यायामध्ये ते लिहितात-

**''ते वाट कृपेची करितु । ते दिशाचि स्नेहभरितु ।**
**जीवातळी आंथरितु । आपुला जीवु ॥''**

किंवा

**''का नाभिकारा उचलिजे । हातु पडलियां देई जे ।**
**नातरी आर्तातें स्पर्शिजे । आळुमाळु ॥**
**पावोनि तो स्पर्शु । मळयानिळू खरपुसु ।**
**येणें मानें पशु । कुरवाळणें ॥''**

असा परतत्वाचा स्पर्श श्री ज्ञानेश्वर महाराजांशिवाय दुसरा कोण देणार आहे ? आणि याचाच अनुवाद श्री तुकाराम महाराज 'लावोनिया हात । कुरवाळिला माथा ॥' या अभंगांनी करतात. म्हणून सर्वसामान्य जीव आपल्या जन्मदात्या आईचे कुरवाळणे विसरु शकत नाही, मग 'सतरावीयेचे स्तन्य देणाऱ्या या विश्वमाऊलीचे कुरवाळणे, स्पर्शणे सातशे वर्षानंतरही अनुभवाजोगे आहे.

४. ज्ञानेश्वरी हा दृष्टिचा म्हणजे डोळ्याचा विषय माऊलीनी करून दाखविला आहे. इथे श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या कविमनाचा साक्षात्कार डोळ्याला होतो. श्री. ज्ञानेश्वर महाराजांचे एक एक दृष्टांत म्हणजे एकेक कथा. दूरदर्शनवरील धारावाहीकेत दाखविलेल्या कथेप्रमाणे आपण त्या पाहू शकतो. दृष्टांतच घ्यावयाचा झाल्यास, जंगलामधून एक माणूस जात होता. त्या जंगलामध्ये एका पाणोठचावर चिखल होता व त्या चिखलामध्ये एक गाय रुतून बसली होती. ती गाय त्या चिखलातून बाहेर पडण्यासाठी धडपड करत होती. तिची धडपड पाहून तो माणूस तिला सोडवण्यासाठी सहाजिकच प्रयत्न करतो. ह्या दृष्टांतातील कथा पुढीलप्रमाणे दिसते.

**''चिखलीं रुतली गाय । धड भाकड न पाहे ।**
**तिचीयेनि ग्लानि । होय कालाभूला ॥''**

असे दृकदृष्टांत ज्ञानेश्वरीमध्ये ठिकठिकाणी दिसतात इतकेच नव्हे तर श्री ज्ञानेश्वर महाराजांचे उत्तुंग व्यक्तिमत्व आपल्याच डोळ्यांनी आपणाला पहाता येते किंवा अतींद्रिये परमात्म्याचा साक्षात्कारही याच ओव्यांच्या माध्यमातून त्यांनी घडवून आणलेला आहे. म्हणून ते म्हणतात -

**''तेणे कारणे मी बोलेन । बोली अरुपाचे रूप दावीन ।**
**अतींद्रिये परि भोगवीन । इंद्रियाकरवी ॥''**

म्हणून ज्ञानेश्वरी हा ''दिठीचा विषय'' त्यांनी केला आहे.

''दिसो परतत्व डोळा । पाहो सुखाचा सोहळा ॥

५. सर्वच बाबतीत श्री ज्ञानेश्वर महाराजांचे व्यक्तिमत्व हे उत्तुंग व वरच्या पातळीवरचे आहे. आजपर्यंत कुठल्याही साहित्यिकांनी ज्याचा विचारही केला नाही तो विचार ते सहज मांडून जातात. सर्व धातूंमध्ये सोने हे पवित्र मानले जाते. परंतु या सोन्यामध्ये एक कमतरता आहे. म्हणून श्री ज्ञानेश्वर महाराज आपल्या शब्दाला केवळ सोन्याची उपमा देत नाहीत तर 'सोनया जोडले सौरभ्य जैसे'' सोन्याला सुगंध देण्याची किमया ही श्री ज्ञानेश्वर महाराजाचीच आहे. आणि हा सोन्याचा सुगंध गेली सातशे वर्षे महाराष्ट्र सारस्वतामध्ये दरवळत आहे. व तो प्रतिक्षणी वाढतच आहे. त्याच्यापुढे जाऊन श्री ज्ञानेश्वर महाराज आपणाला वेगळ्या सुगंधाच्या विश्वामध्ये घेऊन जातात. सुगंधी वनस्पतींमध्ये स्पर्शाबरोबरच सुगंध देणारा चंदन हा प्रसिद्ध आहे. ''सूरभयती मुखं कुठारस्य'' म्हणजे कुऱ्हाडीला देखिल चंदन तोडताना चंदनाचा वास येतो असा अलौकिक शक्ति असलेल्या चंदनामधील उणीव श्री ज्ञानेश्वर महाराजांनी पाहिली व तिला आपल्या ओव्याद्वारे पूर्णता दिली. ते लिहीतात, सर्व जगाला सुगंध देणाऱ्या चंदनवृक्षाला फुले नसावीत हा केवढा दैवदुर्विलास ! या सुगंधी वृक्षाची सुगंधी फुले ना कुणी पाहिली, ना स्पर्शली, ना त्याचा सुवास कुणाला मिळाला. श्री ज्ञानदेवासारख्या तरल कविच्या मनाला या लांच्छनाची जाण आली आणि चंदनाची फुले व त्या फुलांना अलौकिक सुगंध श्री ज्ञानेश्वर महाराज आपल्या वाङ्मयातून जगाला देतात.

सहाव्या अध्यायात 'माझा मराठाची बोलु कौतुके' या चौदाव्या ओवीपासून तेवीसाव्या ओवीपर्यंत इंद्रिय आणि विषय यामधील वेगळे मांडण दिसून येईल. म्हणून श्री ज्ञानेश्वरी ही केवळ एकाच इंद्रियाची अगर एका विषयाची नाही तर ती सर्वात्मक व विश्वात्मक अशी आहे. म्हणून श्री ज्ञानदेवांचे शब्द ही केवळ अक्षरे रहात नाहीत तर त्याला त्यांच्याच भाषेत ''ब्रह्मसाम्राज्यदिपीका'' असे म्हटल्यास वावगे होणार नाही कारण तिची निर्मिती खालील कारणासाठी झाली आहे.

**''तैसा वाग्विलास विस्तारु । गीतार्थेसी विश्व भरु ।**
**आनंदाचे आवारु । मांडू जगा ॥''**

गीतेमध्ये हिंदू धर्मशास्त्राचे सर्व अंग बीजरूपाने आले आहे कर्म ज्ञान व उपासना या मुख्य विषयांबरोबरच सांख्य, योग इत्यादि विषय श्री ज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या अनुभवातून मांडलेले आहेतच. परंतु कलियुगामध्ये सर्व जीवांचा उद्धार करण्यासाठी सर्व शास्त्रांचा तत्त्वज्ञानाचा महासमन्वय श्री ज्ञानदेवांनी आपल्या वाङ्मयामध्ये केला आहे. आणि सर्वांना भक्तिच्या चौकटीत बसवले आहे. श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या काळी धर्म हा कर्मकांडामध्ये गुंतला होता जातीभेद पराकोटीला गेला होता. समाजाचे प्रबोधन व उद्धरण याची पायमल्ली झाली होती. अशावेळी विश्वस्पर्शी व विश्वाच्या सर्व जीवांचा उद्धार करण्यासाठी श्री ज्ञानेश्वर महाराजांनी कर्मकांडाला भक्तिची बैठक दिली. 'कर्मे इशू भजावा' या एका ओवीच्या एका तुकड्यामध्ये श्री ज्ञानदेवांनी कर्म, ज्ञान आणि उपासना एकत्र आणली. कर्माला ईश्वराची प्रतिष्ठा देऊन स्वकर्म हीच ईश्वरपूजा ही भावना कर्माला दिल्यामुळे कर्म होणे भक्ति असा वेगळा साज निर्माण केला. म्हणून ते लिहीतात;

**''तया सर्वात्मकां ईश्वरा । स्वकर्म कुसुमाचीया वीरा ।**
**पूजा केली होय अपारा । तोषालागी ॥''**

अशा रितीने कर्म, ते कोणतेही असो यामध्ये ईश्वरनिष्ठा आणली गेली. मग ते कर्म सजन कसायासारखे मांस विक्रीचे असो, चोखोबासारखे ढोरे ओढण्याचे असो, राहिदासासारखे चर्मकाराचे असो वा श्री नाथमहाराजांसारखे ब्रह्मकर्म असो. त्या कर्मामध्ये भाव कोणता हे भक्तिच्या माध्यमातून श्री माऊलींनी जगाला दिले आणि म्हणूनच एखादा सावतोबा ''कांदा मुळा भाजी । अवघि विठाई माझी ॥'' असे म्हणू लागला तर श्री तुकाराम महाराज ''अवघाची संसार केला ब्रह्मरूप । विठ्ठल स्वरूप म्हणोनिया ॥'' या भावनेने कर्म करु लागले. असा ब्रह्मरूप संसार हाच चिरंतन मार्ग आणि हाच भक्तिचा नवअविष्कार श्री ज्ञानेश्वर महाराजांनी घडविला आहे.

ज्ञानमार्ग हा मोक्षाचा मार्ग 'ज्ञानादेवतु कैवल्यम् ।' असे गीताकार सांगतात. व यासाठी शमदमादिमार्ग मुमुक्षत्व ही साधने सांगितली आहेत. ज्ञानासारखे पवित्र जगामध्ये काहीही नाही. असे असतानाही केवळ मोक्ष मिळणे हेच साध्य हे श्री ज्ञानेश्वर महाराजांना मान्य नाही. म्हणून ते लिहितात;

**''जया सोहंभाव अटकु । मोक्षसुखा लागि झाले रंकु ।**
**तया दिठीचा कलंकु । लागेल तुझिया प्रेमा ॥''**

म्हणून ज्ञानाची परिसीमा ते मोक्षामध्ये करत नाहीत तर त्या ज्ञानाला प्रेमभक्तिची जोड देऊन ज्ञानोत्तर प्रेमभक्ति अशी एक

वेगळी अवस्था निर्माण करतात. 'ज्ञान गिळोनी गावा गोविंद' या नियमाप्रमाणे ज्ञान ही देखील अलिकडची अवस्था आहे; असे श्री ज्ञानेश्वर महाराजांचे मत आहे. यासाठी एक दृष्टांत महत्त्वाचा वाटतो. एका घरामध्ये चोर आले. त्या चोराला घालवण्यासाठी पोलिसाला घर मालकाने बोलविले. पोलिसांनी त्या चोराला हाकलून दिले. चोराला हाकलल्यानंतर पोलिस जाण्याची वाट तो गृहस्थ बघू लागला. परंतु पोलिस तेथून जाण्याची चिन्हे दिसेनात. आणि जोपर्यंत पोलिस जात नाहीत तोपर्यंत त्या गृहस्थाचे जीवनही व्यवस्थित होत नाही. म्हणजे जीवाचे अज्ञान जाण्यासाठी (चोर जाण्यासाठी) ज्ञानाची (पोलिसाची) गरज आहे. पण तेच ज्ञान भक्तसुखाचे जे चिरंतन साध्य आहे. त्याला भेटत नाही. म्हणूनच श्री तुकाराम महाराज म्हणतात;

**''नको ब्रह्मज्ञान आत्मस्थिती भाव ।**
**मी भक्त तू देव ऐसे करी ॥''**

याचसाठी सोऽहम् ज्ञानाला ही ज्ञानेश्वर महाराज 'अटकु' असे म्हणतात. म्हणून अमृतानुभवात त्यांनी ज्ञानखंडन केले. ज्ञानामुळे सायुज्यमुक्ति मिळेलच, परंतु परमेश्वराच्या भक्तिसुखाचा आनंद मिळणार नाही. म्हणून 'शिवंभूत्वा शिवंयजेत' या न्यायाप्रमाणे ज्ञानीभक्त 'मीच होऊंनी पांडवा करिती माझी सेवा' हे भक्तिचे वेगळे स्वरूप श्री ज्ञानदेवांनी सांगितले आहे. म्हणून बाराव्या अध्यायामध्ये भक्ति आणि भक्त यांचे वर्णन करताना त्यांची प्रतिभा बहरुन येते.

**''जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवंत ।**
**हा भक्तियोग निश्चित । जाण माझा ॥''**

असा हा भक्तियोग श्री ज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या आयुष्यामध्ये करुन दाखविला. प्रत्येक भूतामध्ये भगवंत आहेच. ''जीवो ब्रह्मैव ना परः ।'' किंवा ''अणोरणिया महतो महीयां'' या श्रुति वाक्याप्रमाणे केवळ सजीव जीवातील परमात्म्यालाच श्री ज्ञानदेवांनी साद घातली नाही तर भिंतीतील निर्जीव परमेश्वराचे अस्तित्व जागृत केले म्हणून श्री नाथ महाराज लिहितात;

**''निर्जीव चाले भिंती महीमा अगाध ।''**

श्री ज्ञानेश्वर महाराजांनी भिंत चालवून कुठलाही चमत्कार केला नाही किंवा लोकांना चमत्कार दाखविण्यासाठी भिंत चालवली नाही. तर विश्वातील जड वा चेतन, सजीव वा निर्जीव अशा प्रत्येक वस्तूमात्रामध्ये भगवंत आहे. हे केवळ शब्दज्ञान नाही तर ते अनुभवजन्य ज्ञान आहे. हे भिंत चालवून त्यांनी सिद्ध केले. म्हणून ते लिहितात;

**''नोहे हे बोलाचे शास्त्र । संसार जिणते शस्त्र ।**
**आत्मा अवतरविते मंत्र । अक्षरी इये ॥''**

हा भक्तिचा अनुभव त्यांना आला याचे कारण ते स्व-रूपापासून विश्व-रूपापर्यंत गेले होते.

**''हे समस्त श्री वासुदेवो ।**
**ऐसा प्रतिति रसाचा ओतला भावो ।**
**म्हणोनि भक्तिमाजि रावो ।**
**आणि ज्ञानिया तोची ॥''**

आणि म्हणून ज्ञानेश्वर महाराजांच्या भक्तिचे वैशिष्ठ्य हे कि त्यांनी भक्ति ही व्यक्तिपूर्ती मर्यादित ठेवली नाही तर ती विश्वात्मक केली. त्यामुळे विश्व व भक्त यामध्ये फरक न मानता खरे विश्वरूपदर्शन भक्तिमध्ये आहे हे त्यांनी सप्रमाण सिद्ध केले आणि अशा भक्तिमार्गावर आरूढ होण्यासाठी अधिकाराचे बंड त्यांनी मोडून काढले. वेदाचे कृपणपण फेडले. वेद केवळ त्रयवर्णिकांसाठी होते. स्त्रीशूद्राना वेदाधिकार दिला गेला नव्हता. परंतु श्री ज्ञानेश्वर महाराजांनी केवळ स्त्रीशुद्रानाच नव्हे तर भिंत चालवून निर्जिवाना, व रेड्यामुखीं वेद बोलवून पशूनाही भक्तिमार्गावर आणले. 'सहज स्वरुपस्थिती । तया नाव भक्ति ।' अशी भक्तिची सोपी व्याख्या करुन जो देवापासून विभक्त नाही तो भक्त असा साधा मंत्र जगाला दिला.

**''आपणचि विश्व जाहला । तरी भेद भावो सहजचि गेला ।**
**म्हणोनि द्वेशू ठेला । जया पुरुषा ॥''**

अशा विश्वात्मक व्यक्तिमत्वाची कल्पना केवळ श्री ज्ञानदेवामध्येच आपणाला आढळते. त्याच बरोबर श्री अमृतानुभवामध्ये एका सुंदर दृष्टांतासह ते भक्तिचे मर्म वर्णन करतात;

एकदा काय झाले; मिठाचा मोठा खडा समुद्राजवळ गेला. तो अफाट समुद्र पाहिल्यानंतर त्या समुद्राएवढे होण्याची त्याला इच्छा झाली. परंतु खडा या रुपानी असलेले अस्तित्वाचा त्याग करणे आवश्यक असते. या अस्तित्वाचा त्याग केल्याशिवाय सिंधुत्व प्राप्ती नाही. त्याचप्रमाणे जीवाला 'अहं' चा त्याग केल्याशिवाय शिवपद मिळत नाही.

**"सांडून मीठपणाचा लोभु ।**
**मिठे सिंधुपणाचा घेतला लाभु ।**
**तैसा अहं देवुनिया शंभु ।**
**शांभवि जालो ॥"**

परंतु केवळ विश्वात्मक होण्यामध्येच श्री ज्ञानदेवाच्या भक्तिचे रहस्यच नाही तर विश्वरूप होऊन ही भक्ति श्री ज्ञानदेवाना अभिप्रेत आहे. म्हणून ते अशा चहुपुरुषार्थाच्याशिरी असणाऱ्या 'गुरवीभक्ति' बद्दल ते लिहितात;

**"हे विश्वचि माझे घर । ऐसी मती जयाची स्थिर ।**
**किंबहुना चराचर । आपण जाहला ॥**
**मग याही वरी पार्था । माझ्या भजनी आस्था ।**
**तरी तया ते मी माथा । मुगुट करी ॥**
**जे पुरुषार्थ सिद्धि चौथी । घेवोनि आपुलिया हाती ।**
**रिगाला भक्तिपंथी । जगा देतु ॥**
**कैवल्याचा अधिकारी । मोक्षाची सोडीबांधी करी ।**
**की जळाचिये परी । तळवटू घे ॥**
**पार्था गा जगी । तेचि भक्त तेचि योगी ।**
**उत्कंठा तया लागी । अखंड मज ॥"**

श्री ज्ञानेश्वर महाराजांनी वर वर्णन केल्याप्रमाणे पाचवा पुरुषार्थ निर्माण केला आहे. श्री तुकाराम महाराज या भक्तिचा मागोवा घेताना लिहीतात -

**"पायीकपण गेले स्वामी होवोनिया ठेले ।**
**परि नाही विसरणे पायीकपणा ॥"**

या पायीकपणामध्येच भक्तिचे खरे सुख व रहस्य आढळून येते. या भक्तिच्या स्वरूपाची खरी उकल व्हावयाची झाल्यास आपणाला श्री नाथांच्या जीवनाकडे पाहावे लागेल. श्री एकनाथ महाराजांच्या घरी प्रत्यक्ष भगवान बारा वर्षे घरातील सर्व कामे करीत होता. कल्पना करा कि श्री नाथ महाराज हे देवपूजा करण्यास बसले आहेत व त्या देवपूजेसाठी फुले आणणे, गंध उगाळणे इत्यादी कामे श्रीखंड्या रुपाने देवच करीत आहे. म्हणजे देवपूजा करणारे श्रीनाथ हे ही देवच, ज्याची पूजा चालू आहे तो ही देवच. व देव पूजेला साहित्य देणारा तोही देवच. तरीही देवपूजा सुटत नाही. पायीकपण जात नाही व सेवेतील समाधान कमी होत नाही. आणि या सर्व भावांचा सर्व पैलूंचा विचार श्री ज्ञानेश्वर महाराज एका आगळ्या वेगळ्या दृष्टांतामध्ये आपणाला देतात-

एक सोन्याचा पर्वत आहे. त्या पर्वताचा एक भाग कोरुन एका कारागिराने एक सुंदर देवालय निर्माण केले. त्या देवालयामध्ये सुंदर गाभारा व सिंहासन तयार केले. त्या सिंहासनावर सुंदर मुर्ति निर्माण केली व त्या देवापुढे एक भक्तही उभा केला. यामध्ये देव व भक्त यांचे वेगळेपण खरे कां देव देऊळ भक्त यामध्ये असणारे सोन्याचे साम्य खरे याचा उलगडा श्री ज्ञानेश्वर महाराजांनी भक्तिच्या व्यवहारात केला आहे. आणि अभेद भक्तिचे एक वेगळे स्वरूप दाखविले आहे.

**"देव देऊळ परिवारु । की जे कोरुन डोंगरु ।**
**तैसा भक्तिचा व्यवहारु । कां न व्हावा ?"**

अशा तऱ्हेने एका उच्च पातळीवर भक्ति नेऊन ती प्राप्त होण्याचा सोपा मार्ग म्हणजे शुद्ध भावाचा मार्ग श्री माऊलींनी आपणाला हरिपाठामध्ये सांगितला आहे;

**"भावेविण भक्ति । भक्तिविण मुक्ति ।**
**बळेविण शक्ति । बोलू नये ॥"**

शुद्ध भावाशिवाय भक्ति नाही आणि शुद्ध भाव निर्माण होण्यासाठी शुद्ध विचारांची गरज असते हा शुद्ध विचार श्री ज्ञानेश्वर महाराजांनी आपणाला दिला. अशा संतांचे वर्णन ते खालीलप्रमाणे करतात-

**"ते चालते ज्ञानाचे बिंब । तयाचे अवयव ते सुखाचे कोंभ ।**
**येर माणूसपण भांब । लौकिक भागू ॥"**

वास्तविक पाहाता ही ओवी म्हणजे श्री ज्ञानेश्वर महारजांचेच वर्णन आहे. असा हा महान योगी नाथ सांप्रदायाचा कापडी, शैव सांप्रदयाचा अभिमानी जेव्हा या सर्व तत्वज्ञानांना घेऊन खांद्यावर वारकऱ्याची पताका घेतो व पंढरीच्या वाटेला लागतो तेव्हा भक्तिची ज्ञानगंगा दुधडी वाहू लागते. सर्व जगाचे पाप ताप फेडीत हा ज्ञानियाचा सूर्य जगाचे अंधपण फेडीत विश्वप्रदक्षिणेला निघाला आहे. पण ही प्रदक्षिणा करीत असताना त्याचे हात मोकळे रहात नाहीत किंवा त्याची प्रदक्षिणा कधीही संपत नाही. कारण जगदोद्धार ही न संपणारी क्रिया आहे. म्हणूनच खालील ओवीमध्ये "रिगाला भक्तिपंथे" असा रीतीवर्तमानकाळ घालून भक्तिपंथाचे मार्गक्रमण कसे नित्य चालू आहे हे सुचवितात -

**जे पुरुषार्थ सिद्धि चौथी । घेवोनि आपुल्या हाती ।**
**रिगाला भक्तिपंथी । जगा देतु ॥"** 卐卐卐

# अहर्निश परमार्थासाठी नामसंगती हवी

## श्रीगुरुदेव रानडे यांनी केलेला भक्तिबोध

– प्रा. डॉ. नरेंद्र कुंटे



भारतीय अध्यात्मशास्त्र हे ईश्वराचा शोध घेऊन, त्याचे दर्शन घडविणारे असून, त्यासाठी सामान्य माणसांनी/परमार्थसन्मुख होण्यासाठी/साधक व्हावे, असे सांगते. वेद, उपनिषदे, गीता या प्रस्थानत्रयीत देवप्राप्तीसाठी साधकाला साधनमार्ग उपदेशिला गेला आहे. या साधन मार्गातले देव कळून येतो, आत्मसात होतो... असा सर्व संतांचा अनुभवसिद्ध दाखला आहे. यातले मुख्यसाधन म्हणजे नामस्मरण होय. भक्तिमार्गात 'नामसंगती' ही सर्वाधिक महत्त्वाची होय. त्याविषयीचाच विचार इथे प्रस्तुत आहे.

**विसाव्या शतकातील थोर संत आणि तत्त्वज्ञ डॉ. रा. द. तथा गुरुदेव रानडे यांनी भक्तिमार्गात 'नामसंगती' हीच सर्वाधिक महत्त्वाची मानली आहे. अहर्निशी-परमार्थासाठी गुरुभेट, गुरुबोध, ग्रंथसान्निध्य, साधक मेळावा आणि देवाचा अनुभव या सर्व 'सत्संगतीसाठी' नामसंगती हवी, असा भक्तिबोध त्यांनी केला आहे. त्याविषयीच्या विचारांचा हा मागोवा.**

### चरित्र संदर्भ....

श्री गुरुदेव रानडे यांनी 'नामसंगती' ही सर्वाधिक महत्त्वाची होय, असे म्हटले आहे. त्यांच्या भक्तिबोधाचा मागोवा घेण्यापूर्वी त्यांचा चरित्रसंदर्भ पाहणे अगत्याचे आहे. श्री. गुरुदेव रानडे यांचा जन्म जमखिंडी येथे इ.स. १८८३ साली झाला. मॅट्रिकच्या परीक्षेत मुंबई विश्वविद्यालयात दुसरा क्रमांक मिळवून त्यांनी पहिली जगन्नाथ शंकरशेठ शिष्यवृत्ती मिळविली. वयाच्या १४ व्या वर्षी त्यांनी श्री भाऊसाहेबमहाराज उमदीकर यांचेकडून नाम (अनुग्रह) घेतले. तिथून त्यांच्या अध्यात्मिक जीवनास प्रारंभ झाला. उत्तरोत्तर त्यांना अलौकिक नि अध्यात्मक अनुभव आले. एम. ए. परीक्षेत त्यांनी चँसेलरचे सुवर्णपदक मिळविले. त्यांची प्रकृती तोळामासाच होती. परंतु निष्ठेने आणि नेमाने त्यांनी नामस्मरण केले. १९२० सालाच्या आजारात त्यांनी सद्गुरूंच्या समाधिसन्निध जाऊन (इंचगेरी येथे) साधन केले. वयाच्या ३५ व्या वर्षी त्यांनां अनेक नामे ऐकू येऊन गुरुपदाचा अधिकार प्राप्त झाला. आत्मोद्धाराबरोबरच जगतोद्धाराच्या तळमळीतून त्यांनी निंबाळ (ता.इंडी, जिल्हा विजापूर) येथे

आश्रम स्थापन केला. खरे तर हा आश्रम म्हणजे त्यांचे जुने राहते घरच होते. १९२५ साली त्यांनी ते बांधले होते. उपनिषद्रहस्य ग्रंथात (१९२६ साली प्रसिद्ध झालेल्या) त्यांनी घराचा उल्लेख 'आश्रम' म्हणून केला आहे. नंतर त्यांनी नवे घर बांधले. (सध्या जुन्याघराचेच रूपांतर आश्रमात करण्यात आले असून तेथेच समाधिस्थान निर्माण करण्यात आले आहे.) श्री गुरुदेवांनी 'उपनिषद्रहस्य' 'गीता:साक्षात्कारदर्शन' तसेच संतवचनामृत, ज्ञानेश्वर वचनामृत, तुकाराम वचनामृत, रामदासवचनामृत हे ग्रंथ लिहून त्यांना विवेचक प्रस्तावना लिहिल्या व त्यांतून आपला 'अध्यात्मिक उपदेश' प्रकट केला आहे. 'नित्यनेमावळी' ही सांप्रदायिक-उपासनेची पुस्तिका त्यांनी तयार केली, त्यालाही लिहिलेल्या प्रस्तावनेत त्यांच्या विचारांची 'सूत्र-बीजे' पहावयास मिळतात. १९१७ साली ते अलाहाबाद विद्यापीठात तत्त्वज्ञानाचे विभागप्रमुख म्हणून रूजू झाले. १९४७ साली ते तेथून कुलगुरूपद भूषवून सेवानिवृत्त झाले. पुढे ते निंबाळ येथेच स्थायिक झाले. अनेकांना त्यांनी अनुग्रह दिला. ते 'गुरुदेव' झाले. ६ जून १९५७ ला (ज्येष्ठ शुद्धदशमी) त्यांचे निंबाळ येथे महानिर्वाण झाले. निंबाळ हे आता 'पुण्यक्षेत्र' झाले आहे.



गुरुदेवांचे एक दुर्मिळ छायाचित्र

### प्रथम 'गुरुकृपा' हवी .....

भक्तिमार्गात सत्संगाची फारफार आवश्यकता आहे, असे श्री गुरुदेवांनी आपल्या ग्रंथात आणि पारमार्थिक चर्चेत (बैठकीत) अनेकदा सांगितले आहे. या सत्संगाचे स्वरूप वेगवेगळे असले तरी त्यांत 'नामस्मरण' ही मुख्यसत्संगती त्यांनी प्रतिपादिली आहे. त्यांचे चरित्र पाहिले तर वयाच्या अवघ्या १५ व्या वर्षी त्यांनी 'गुरूमंत्र' प्राप्त करून घेतला. पुढे प्रकृती जेव्हा जेव्हा अस्वस्थ असे तेव्हा आणि १९०९ आणि १९२० यादोन आजारात ते 'गुरुसमाधिसन्निध' इंचगेरी येथे गेले. तेथे त्यांनी 'गुरुसंगती' ला अनुलक्ष्यून साधन केले. पुढे तर कायम ते 'एकटे' साधन करीत असले तरी त्यांनी सप्ताहाच्या निमित्ताने सतत साधकांची संगती महत्त्वपूर्ण मानून त्यांचे समवेतही नामसाधना केली. कोणत्याहि सत्संगात पहिला सत्संग गुरूकृपेचा असणे अत्यंत आवश्यक असते. कारण परमार्थात गुरूकृपेशिवाय पाऊल पडतही नाही आणि प्रगतीही होत नाही. गुरूकृपा होणे याचा अर्थ असाकी, प्रथम गुरूंची भेट व्हायला हवी. गुरूभेट होऊन त्यांचेकडून 'गुरूमंत्र' (नाम) मिळायला हवा. तो मिळाला म्हणजे साधक खऱ्या अर्थाने गुरुपुत्र होतो. तो संप्रदाय विशिष्ट असा साधनमार्ग अनुसरू लागतो. गुरू देहाने भेटत नसतील तर संतांची समाधिस्थाने ही सदुरूंच्या अस्तित्त्वाचीच ठिकाणे आहेत. तेथे जाऊन, त्यांचेचरणी प्रार्थना करून, आपल्या आवडत्या देवाचे (उपास्य देवतेचे) नांव हेंच 'गुरूमंत्र' म्हणून घ्यायचे. पारमार्थिक जीवनाचा प्रारंभ अशा गुरूकृपा संगतीनेच होतो. श्रीगुरुदेवांनी आपल्या ग्रंथातून आणि पारमार्थिक चर्चेतून (बैठकीतून) गुरूभेट आणि गुरूकृपामंत्र याविषयी साधकांना मार्गदर्शन केले आहे. इतकेच नव्हें तर जेंव्हा जेंव्हा त्यांना दुखण्याने बेजार केले जाई. तेव्हा तेव्हां ते गुरुसमाधिसान्निध जाऊन गुरुसंगतीचा लाभ घेत असत. नाम घेतले की, त्या नामाचे स्मरण करणे ही 'नामसंगती' देखील अत्यावश्यक आहे.

### नामसंगतीनेच 'देवदर्शन' .....

गुरूबोध (नाममंत्रकृपा) झाला की, नामस्मरण नेमाने, नित्य, कट्टाने (विशिष्ट वेळ ठरवून घेऊन त्यावेळेला) करणे यालाच 'साधन' म्हणतात. गुरूंकडून जे नाम मिळते त्याला 'सबीज' नाम असे म्हटले जाते. त्याच नामात गुरूंनी 'कृपाशक्ती' दिलेली असते. एरव्ही ही कोणत्याही देवाचे नाम घेतले तर ते वाया जाईल असे नाही. पण गुरूंकडून ते घेतले असेल तर त्या नामाने 'प्रगती' अधिक लवकर होते, हे मात्र निश्चित. नाम स्मरण सदैव आणि सर्वत्र करीत राहणे हीच 'नामसंगती' होय. श्रीगुरूदेवांनी म्हटले आहे की, 'ज्ञान, कर्म व भक्ती हे मार्ग स्वतंत्र नाहीतच; पण खऱ्या परमार्थप्राप्तीचेही ते मार्ग नव्हेत. कर्म हे मंदिराच्या प्रांगणापर्यंत, ज्ञान हे सभामंडपापर्यंत, आणि नामस्मरणभक्ती ही गाभाऱ्यापर्यंत जाते. ध्यान (नामस्मरणात्मक भक्तियोग) हेच देवप्राप्ती करून देऊ शकते. जगातील सर्व सत्पुरुष याच वाटेने गेले व त्यांनी हाच

पंथराज पुढील साधकांना मिळवून दिला. नामस्मरण हेंच एकमेव साधन होय. नाम हे साक्षात्कार-पर्यवसायी तत्त्व आहे.' (श्री गुरूदेववचनामृत/प्रकाशक श्री. रामण्णा कुलकर्णी/ प्र. आ. १९७९ /पृष्ठ क्र. २१-२२/मूल्य रु. ३) नामस्मरणाने देवाचे स्वरूप कळून येऊ लागते. रूप, रस, गंध, नाद, तेज इत्यादि स्वरूपाचे अनुभव साधकाला येऊ लागतात. देवाचे स्वरूप अनंत आहे. त्याकडे जाणारे मार्ग (पंथ) देखील पुष्कळ आहेत. परंतु देवाचे रूप जाणण्यासाठी आणि ते जाणून घेऊनही त्या स्वरूपात (प्रचिती) वाढ होत असल्याने तेही अनुभवण्यासाठी नामसंगती (सदैव नामस्मरण) ही अगदी अगदी अत्यावश्यक आहे. 'ही नामसंगती देह पडेपर्यंत सांभाळावी लागते; असे श्रीगुरूदेवांचे गुरूबंधू श्री अंबुराव महाराज हे सांगत असत. 'आधंळयाने दोरी वळावी, ती किती वळून झाली आहे त्याला कळत नाही. तसे नामस्मरण करावे' अशी पुस्ती श्री अंबुराव महाराज आपल्या प्रवचनात जोडत असत. श्री गुरूदेव आपल्या पारमार्थिक चर्चेत (बैठकीत) याविषयीचा आवर्जून उल्लेख करीत असत. श्वासोच्छ्वासागणिक घ्यावे, असे श्रीगुरूदेवांनी सांगितले आहे. श्वासअखंड चालतो, तसे नाम अखंड घ्यावे, असे ते सांगत असत. नामसंगती ही अखंडच असली पाहिजे, हेंच त्यांनी आग्रहपूर्वक सांगितले आहे.

## संतसंगतीने प्रेम वाढते .....

दुसरी सत्संगती म्हणजे संतसंगती होय. संप्रदायातील ज्येष्ठसाधक किंवा ईश्वराचा अनुभव (प्रचिती) ज्याला आहे. असा कोणताही सत्पुरुष असो, त्याच्या संगतीत राहणे अगदी अत्यावश्यक आहे. श्रीगुरूदेवांनी म्हटले आहे की, 'परमार्थ-प्रेम वाढण्यास संतसगाइतके सोपे व रामबाण साधन नाही' (श्रीगुरूदेववचनामृत/पृष्ठ क्र.५१) श्रीगुरूदेव साधकांच्या मेळाव्याला देखील संतसंगतीच म्हणत असत त्यांनी म्हटले आहे की, 'ज्यांनी देव पाहिला आहे, त्यांचे दर्शन देवदर्शनच होय. सत्पुरुषांची सेवा ही फार मोठी संतसंगती होय. सेवा करतानाही नामस्मरण हवेच.' (तत्रैव) संतसंगतीचे महत्त्व विशेष आहे. श्रीगुरूदेवांनी म्हटले आहे की, ''देहभाव हारपला। जिता विठ्ठल बोलिला' अशी स्थिती होणे हे नामस्मरणाच्या अभ्यासावर अवलंबून आहे. यासाठी जाणत्याच्या संगतीने झिजावे. सत्संगतीत नामस्मरण करावे; म्हणजे करंटा देहभाव जातो.'' (अमर संदेशसुधा/लेखक-प्रकाशक : शा. नी. देशपांडे) प्र. आ. १९५८/पृष्ठ ७) जाणत्याची संगती धरावी, असे समर्थ रामदासांनीही मनाच्या श्लोकात म्हटले आहे. जाणता भक्त म्हणजे गुरूकृपांकितनामधारक होय. जाणताभक्त म्हणजे देव जाणणारा भक्त होय. साधक-सत्पुरुषांची संगती संगती हीच सत्संगती हीच सत्संगती असून त्यांच्या संगतीने देहावरील प्रेम (अहंकार) कमी होऊन देवाविषयी प्रेम (आसक्ती/दृढश्रद्धा) निर्माण होते. श्रीगुरूदेवांनी भक्तमेळावा म्हणजे संतसंगती असेही म्हणले आहे. नाम संगती काय वा गुरूसंगती काय, संतसंगतीही असली काय, एकूणत:च 'सत्पुरुषांची संगती ही नदीप्रमाणे आहे. सत्संग हे एक दैवी किंवा पारमार्थिक जीवन आहे' (अमर संदेशसुधा/पृ. ३५-३६) असे श्री गुरुदेवांनी म्हटले आहे. 'जो तो आपल्या कुवतीप्रमाणे या सहजीवनास मदत करतो व स्वत:च्या जरूरीप्रमाणे त्याचा उपयोग करून घेतो. या सहजीवनात अहंकार रहात नाही. सत्संग हा आपोआप घडेल; त्याबद्दल फार आग्रह धरू नये. परंतु सद्गुरूंच्या संगतीपेक्षा सज्जनांचा सहवास अधिक महत्त्वाचा असतो.' (तत्रैव) श्री समर्थ रामदासांनी देखील मनाचे श्लोकमध्ये म्हटले आहे की, सदा संगती सज्जनांची धरावी.' तिथेही सज्जन-संगती यांचा अर्थ गुरूसंगती व संतसंगती असा अभिप्रेत आहे. श्रीगुरूदेवांनी सामुहिक-नामस्मरणावरही भर दिला आहे. सर्वांनी मिळून नामस्मरण करण्याने एक शक्ती निर्माण होते; त्याचा फायदा एकमेकास होतो. 'सत्संगती शिवाय साधन होणार नाही' असे श्री गुरूदेवांनी निक्षून सांगितले आहे. (तत्रैव) नुसते साधन करून काय होते? संतसंगतीही असली पाहिजे. श्रीगुरूदेवांनी स्वत:ही आपले सद्गुरू श्रीभाऊसाहेब महाराज व गुरूबंधू श्रीअंबुरावमहाराज यांचेबरोबर प्रवास-फिरतीत राहून सहवास-संगतीचा लाभ घेतला होता. 'समाधिसान्निध्यात (गुरूसंगती) व साधकांच्या संगतीत (संत-सज्जन) परमार्थ साधण्याकरिता भक्तमंडळींनी जरूर जावे. एका महिन्यातच परमार्थात पाऊल पुढे पडू शकेल; अनुभवात वाढ होईल, परमार्थाची आठवण राहील' (मुख्यकर्तव्याची) असे त्यांनी म्हटले आहे. (अमरसंदेश सुधा/पृष्ठ ३८)

## ग्रंथसंगती व देवदर्शन .....

श्री गुरूदेवांनी 'ग्रंथसंगती' हाही एक सत्संगच मानला आहे. रोज कांही लिहावे, वाचावे म्हणजे परमार्थविचार मनावर ठसतात, असे ते सांगत असत. 'गुरूवचन' हाही सत्संगच होय. त्यांनी आपली सद्गुरू श्रीभाऊसाहेबमहाराज यांची पत्रे फार जपून ठेवली होती. ही पत्रे म्हणजे ते ग्रंथसंगती/गुरूसंगती होय,

असे मानत होते. अलाहाबाद ते निंबाळ हा त्यांचा प्रवास (ते अलाहाबादला नोकरीस असताना) अनेकवेळा होई. त्या प्रत्येक वेळी ही पत्राची पेटी त्यांच्या जवळ असे. शिवाय पारमार्थिक चर्चेच्या वेळी (बैठकीत) हीच पत्रें ते वाचण्यास सांगत व त्यावर चर्चा घडून येई. त्यांचे त्यावरचे भाष्य हाच पारमार्थिक-उपदेश असे. संत-सद्गुरू-सत्पुरुष यांचे ग्रंथ म्हणजे त्यांचे 'आत्मरूप' च असते 'श्रीगुरूदेवचरितामृत' पुस्तिकेत श्री.म.श्री देशपांडे यांनी श्रीगुरूदेवांचे ओवीबद्धचरित्र लिहिले आहे. त्यांत पाचवेपुष्प 'डाबोध-प्रदीप' हे आहे. त्यात कवीने ओवीरचली आहे ती अशी की, 'देवाभक्तोच प्रेमळ नाते। पाहुनि अंतरी भक्ति वाढते। साधका ते तेणे स्फूर्ति येते । परमार्थपथी चालावया।. मग तो जाणत्याचा शोध करी। जाणत्याचा संग धरी। सद्गुरूकडून स्वीकारी। सबीजनाम तेधवा' (प्रकाशक: श्रीगुरूदेव रानडे आश्रम, निंबाळ/पृष्ठ ३३) जाणत्याचा शोध 'सत्संगाची महती' असे शीर्षक देऊन कवीने म्हटले आहे की, 'ध्यान भावयुक्त व्हावया। सत्संग एकचि सुलभोपाय। सत्संगे परमार्थ होय। सहजसाध्य साधका।। संतसमागम हा सत्संग । नामाचे स्मरणही सत्संग। सद्वस्तुदर्शनही सत्संग। संतांच्या अभिमते' (तत्रैव/पृ३५) 'संतसंगे भाव चढे। भावासवे देव जोडे' असेही सूत्रभाष्य कवीने केले आहे. वस्तुदर्शन म्हणजे नामस्मरणाने देवाचे रूप (नाद, तेज, रूप, गंध, रस इत्यादी) दिसणे होय. पुढे हे दर्शन म्हणजेही 'सत्संग' च होय. श्रीगुरूदेवांना सदैव हा 'देवदर्शन-सत्संग' लाभलेला होता. एकदा तर निंबाळला सप्ताहात भजन भावयुक्त झाले-तेव्हा श्री गुरूदेवांनी 'सोप्यावरचा केर टाकून देऊ नका, तो ठेवून द्या. ते संतचरणरज आहेत' असे म्हणून ही सतसंगती किती श्रेष्ठ प्रकारची आहे, हेही सांगितले होते. (गुरूदेव रानडे यांच्या पुण्यस्मृती/संग्राहक : कृ.दा. संगोराम/ श्रीगुरूदेव रानडे आश्रम, निंबाळ/प्र.आ. १९६४.६४/पृष्ठ ३७) सत्संगती विषयी एकदा श्रीगुरूदेव म्हणाले होते की, 'एक नेम करीत बसलेला पहिला की दुसऱ्यासही नेमास बसण्याची इच्छा होते चांगल्या बीजाला हा परिणाम. सामुदायिकरीतीने नेम करावा.' (तत्रैव/पृ. १०५) सत्संगात साधन करावे, हे सांगताना श्रीगुरूदेव म्हणाले की, 'ज्यांना प्रचिती आहे अशा



गुरूदेव रानडे

साधकांच्या संगतीत राहून नेम केला म्हणजे नव्या साधकांना लवकर प्रचिती येते. एका सतारीच्या तारा छेडल्याकी, इतर तारातून आवाज निघू लागतात. साक्षात्काराच्या प्रचितीच्या लहरीदेखील नव्या साधकात तशा लहलरी उत्पन्न करतात.' (तत्रैव/पृ. ११८) सत्संगती शिवाय परमार्थातही प्रगती नाही. मी ही त्याला अपवाद नाही. म्हणून येथे साधक मंडळींना बोलावतो' असेही ते म्हणाले होते (तत्रैव/पृ. १३८)

## 'भक्ती-उपाधी' विचार .....

नामस्मरण हा मुख्य 'सत्संग' होय. त्याला पूरक/पोषक/उपकारक असा सत्संग ग्रंथसहवास, गुरूसहवास, साधकसहवास होय. अशा सत्संगाने नामसाधना अधिक दृढतर आणि तीव्रतर होते. सत्संगविषयक विचारांचे सूत्र श्रीगुरूदेवांनीही त्यांचे सद्गुरू श्रीभाऊसाहेबमहाराज यांच्या पारमार्थिकपत्रातून घेतले आहे. कारण या पत्रातून श्री भाऊसाहेब महाराज यांनी सांगितले आहे की, नामस्करण ही 'मुल्यभक्ती' होय. ही उपाधी मुल्यभक्तीला उपकारक असते. त्यांत फार गुरफटू नये, पण उपाधी सोडूही नयेत, असे त्यांचे सांगणे होते. श्रीगुरूदेवांनीही 'मुल्यभक्ती' म्हणून नामस्मरणासच महत्त्व दिले आणि इतर उपाधी सत्संग स्वरूपात अनुसरल्या. अहर्निशपरमार्थ करण्यासाठी गुरूसंगती, नामसंगती देवदर्शन संगती हीच उपकारक आहे. तरीही नामसंगती मात्र अखंडपणे असावी, असा भक्तिबोध त्यांनी केला आहे. कारण नाम-रूप मिळूनच गुरू-देव आहेत.' देव दाखविणारे नामच होय. ते नाम गुरूच देतात. गुरूच नामसंगतीने देव दाखवितात; हा अत्यंत तर्कशुद्ध-अध्यात्मविचार श्रीगुरूदेवांनी प्रतिपादिला आहे. यालाच ते डोळस-परमार्थ असेही म्हणतात. 'नामस्मरण हाच परमार्थ होय' असे अध्यात्मसूत्रही त्यांनी सर्वत्र मांडले आहे. म्हणून गुरू आणि देव यांना जोडणारे 'नाम' हेंच भक्तिमार्गाचे मूल्य बीज आहे, तेंच देवकृपेने पुन्हा प्राप्त होत राहून गुरूपद मिळणे हे भक्तिमार्गाचे फळही आहे. म्हणूनच श्री तुकोबारायांच्या शब्दातच श्रीगुरूदेवांनी भक्तिसूत्र सांगितले आहे ते असे की, 'नाम नाम नाम विठोबा, नाम तुझे सार' नामाचे इतके महत्त्व आहे. जाणत्याची संगती धरावी आणि नाममंत्र घेऊन परमार्थाला आरंभ करावा; हेंच खरे ! सत्संगतीशिवाय परमार्थ नाहीच नाही !!

卐 卐 卐



# ॐ नमः शिवाय

– स्वामी शिवानंद

**महाशिवरात्र हा उत्सव गोकुळाष्टमी, रामनवमीसारखाच मोठ्या हर्षोल्हासाने भारतभर साजरा केला जातो. शिरडी येथेही श्री साईबाबा संस्थान तर्फे हा उत्सव साजरा केला जातो. या निमित्ताने आपण शिवपुरणांचा थोडक्यात परिचय घेऊ व महाशिवरात्र विषय असलेली पारंपारिक कथा श्रवण करू.**

सर्व जग शिवस्वरूप आहे असे प्रतिपादन करणारे शिवपुरण शिवभक्तांचे विशेष आवडते पुराण आहे. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या प्रारंभी जे मंगलाचरण लिहिले आहे त्या मध्ये श्रीगणेशाचे वर्णन करताना ज्ञानदेव म्हणतात.

**अष्टादश पुराणे । तिची मणिभूषणे ।**

त्यामुळे आपण समजतो तसे पुराणे म्हणजे भाकडकथा, असे ज्ञानदेवांच्या बुद्धिमत्तेला वाटत नव्हते हेच यात दिसते आणि त्यामुळे पुराणाचा विचार वेगळ्या पातळीवर करणे भाग ठरते महाशिवरात्रीचे निमित्त साधून आपण शिवपुराणाचा अल्प परिचय करून घेऊ या.

शिवपुराण हे महापुराण की उपपुराण याबद्दल पूर्वीपासून मतभेद आहेत. विष्णुपुराणाच्या यादीत हे पुराण समाविष्ट असून त्याचा क्रमांक चौथा आहे. देवी भागवत्, मत्स्यपुराण नारदपुराण आणि चौथे वायुपुराण म्हणजेच 'शिवपुराण असे समजले जाते. शिवपुराणातील बराचसा भाग वायुदेवांनी सांगितला असल्यामुळे व या पुराणाचे वायवीय

संहिता या नावाचे दोन भाग असल्यामुळे काहीजण शिवपुराण व वायुपुराण एकच मानतात. पण आज दोन्ही पुराणातील वर्ण्यविषय व स्वरूप लक्षात घेता ती वायुपुराण व शिवपुराण ही दोन पूर्णतः स्वतंत्र पुराणे आहेत हे स्पष्ट होते.

### ७ संहिताच फक्त उपलब्ध ५ गायब

शिवपुराण सुमारे एक लाख श्लोकांचे आहे असे मानले जाते १) विद्येश्वर २) रुद्र ३) विनायक ४) उमा ५) मातृ ६) एकादशरूद्र ७) कैलास ८) शतरूद्र ९) कोटीरूद्र १०) सहस्त्रकोटी रूद्र ११) वायुप्रोक्त आणि १२) धर्म अशा शिवपुराणाच्या बारा संहिता असून एकूण श्लोक संख्या १ लाख असल्याचे सांगतात. पण एक लक्ष श्लोकांचे शिवपुराण आज भारतात कोठेही आढळत नाही. मुंबई मथुरा येथून प्रसिद्ध झालेल्या शिवपुराणाची श्लोकसंख्या फक्त २४ हजार आहे. या पुराणात आज फक्त ७ संहिता सापडतात. अन्य ५ संहिता मिळत नाहीत.

शिवपुराणाच्या आज प्राप्त असलेल्या ७ संहिता व त्यांचे अध्याय पुढीलप्रमाणे

१) विद्येश्वरसंहिता : २५ अध्याय
२) रूद्रसंहिता : १९७ अध्याय
३) शतरूद्रसंहिता : ४२ अध्याय
४) कोटिरूद्रसंहिता : ४३ अध्याय
५) उमासंहिता : ५१ अध्याय
६) कैलास संहिता : २३ अध्याय
७) वायवीयसंहिता : पूर्वभाग ३५ अध्याय
उत्तरभाग ४१ अध्याय

असे ७ संहितेचे मिळून ४५७ अध्यायाचे शिवपुराण सध्या आपणास पहावयास मिळते.

विद्येश्वर संहितेत शिवपुराणाचा परिचय, शिव व शिवलिंग यांच्या पूजेचे रहस्य आदी विषय आहेत. रूद्र संहितेच्या पहिल्या खंडाला सृष्टी खंड म्हणतात. त्या शिवापासून सृष्टी कशी निर्माण झाली वगैरे भाग आहे. दुसऱ्या खंडास सती खंड म्हणतात. त्या दक्ष व सतीची कथा आदी भाग आहे. तिसऱ्या खंडास पार्वती खंड म्हणतात. त्यात पार्वती तपश्चर्या, शिवपार्वती विवाह आदी विषय आहेत. शतरूद्र संहितेत शिवाच्या विविध अवतार कथा आहेत. कोटिरूद्रसंहितेत प्रामुख्याने द्वादश ज्योतिर्लिंग व उपलिंगाचे महात्म्य कथन केलेले आहे. उमा संहितेत प्रामुख्याने आचार धर्म विवेचन आहे. कैलास संहितेत मुख्यतः तात्त्विक प्रश्नांची चर्चा आहे. वायवीय संहितेतील पूर्वखंडात वायुदेवाकडून शैवागमाचे विवेचन आदी भाग आहे तर वायवीय संहितेच्या उत्तरखंडात पंचाक्षरमंत्र, गुरूमहात्म्य, पूजानिधी ध्यान, शिवतत्त्वाचे आचारधर्म आदी विषय आहेत.

### शिवरात्रीव्रताचा व्याधाला लाभ

फार पूर्वीची हकीगत आहे. गुरुद्रुह नावाचा एक भिल्ल वनात रहात होता. त्याचे कुटुंब मोठे असून तो क्रूरकर्मा होता. प्रतिदिन तो मृगया करी व नाना प्रकारच्या चोऱ्या करून पोट भरी. त्याने कोणतेच शुभकर्म केले नव्हते. एकदा शुभकारक अशी शिवरात्र आली. तो वनात रहात असल्याने त्याला याची काहीच कल्पना नव्हती. तो नेहमीप्रमाणे शिकार करण्यासाठी वनात गेला. दैवयोगाने त्याला कसलीच शिकार मिळाली नाही. त्याला मोठेच दुःख झाले. तो एका जलाशयापाशी आला. येथे कोणी जनावर पाणी पिण्यासाठी जरूर येईल अशा विचाराने तो काठावरील बेलाच्या झाडावर चढून सावजाची वाट पाहात बसला. भुकेने, तहानेने पीडलेली एक हरिणी दौडत दौडत त्या जलाशयापाशी आली. त्या मृगीस पाहून व्याधाला मोठा आनंद झाला. तिचा वध करण्यासाठी त्याने एक बाण सज्ज केला. या धांदलीत हातून थोडेसे जल व बिल्वपत्रे खाली पडली. त्या झाडाखाली एक शिवलिंग होते. अज्ञानाने का होईना व्याधाच्या हातून शिवपूजा घडली. व त्याचे पातक नष्ट झाले. त्याच्या हालचालीचा सुगावा हरिणीस लागला. व्याधाला पाहून भयभीत होऊन मृगी व्याकूळ होऊन म्हणाली,

'व्याधा, तू हे काय करतो आहेस?'

'आज माझं कुटुंब भुकेलेलं आहे. आज तुला मारून मी भूक भागविणार आहे.'

'भिल्ला, माझ्या मांसानं तू सुखी होशील. या अनर्थकारी शरीराचं इतकं पुण्य? पण व्याधा, या वेळी माझी सर्व मुल माझ्या घरीच ओहत. व्याधा, मी शपथ घेते. मी घरी जाऊन परत तुझ्याकडं येईन. मी तुझा विश्वासघात नाही करणार.'

'ठीक आहे. तू घरी जा. पण लौकर परत ये.'

मृगी मोठ्या हर्षाने घरी गेली. थोड्या वेळाने ज्या बहिणीची आठवण मृगीने काढली होती ती पाणी पिण्यासाठी आली. व्याधाने तिच्यावर बाण रोखला. असे करताना पुन्हा झाडाखाली शिवपिंडीवर जलबिंदू पडले. बिल्वपत्रे पडली. बाण सुटत आहेसे पाहून त्या मृगीने विचारले, 'वनचरा, तू हे काय करतो आहेस?' त्यावर व्याध म्हणाला, 'मी आपल्या भुकेलेल्या कुटुंबास तृप्त करण्यासाठी तुला मारणार आहे.' त्यानंतर मृगी म्हणाली, 'व्याधा, माझं थोडं ऐक ना. मी धन्य

आहे. माझ्या या अनित्य शरीराचा दुसरा उपयोग कोणता? पण माझे छोटे छोटे बच्चे घरी आहेत. मी घरी जाते. त्यांना माझ्या स्वामींकडे पोचते करीन आणि पुन्हा मी परत येईन.

'तुझ्यावर माझा विश्वास नाही. मी तुला आज मारणार.'

'व्याधा, माझं ऐक तू. मी जर परत आले नाही तर माझं सारं पुण्य संपून जाईल. मी जर परत येणार नाही तर मला भारी पाप लागेल.'

'तर मग जा तू घरी.'

मृगी अत्यंत हर्षाने घरी गेली. रात्र संपत आली. मृगी परत येत नाही हे पाहून व्याध तिच्या शोधात राहिला. एवढ्यात त्याने जलापाशी एक हरिण पाहिले. ते मोठे धष्टपुष्ट होते. त्याला पाहून व्याधाला मोठाच आनंद झाला. प्रारब्धवश आणखी थोडे जल व बिल्वपत्र झाडाखाली पिंडीवर पडले. पान पडल्याचा आवाज होताच दचकून मृगाने वर व्याधाकडे पाहून विचारले,

'काय करणार रे तू?'

'मी माझ्या कुटुंबास भोजन देण्यासाठी तुला मारणार.'

मोठा हर्ष होऊन मृग म्हणाला, 'मी धन्य आहे. माझ्या मासानं आपली तृप्ती होणार! पण एकदा मला घरी जाऊन येऊ दे. मी माझ्या बालकांना त्याच्या मातेच्या हाती सोपवून येतो. त्यांना धीर देऊन परत येतो.'

व्याधाचे हृदय शुद्ध होत होते. त्याचे पाप नष्ट होत राहिले होते. तो म्हणाला, 'इथं आतापर्यंत जे आले ते तुझ्यासारखंच म्हणून गेले. पण ते वंचक अजून आले नाहीत. मृगा, तूही संकटात दिसतो. तू खोटं बोलून निघून जाणार. मग माझा निर्वाह कसा होणार?'

'व्याधा, मी असत्य नाही बोलणार. ज्याची वाणी असत्य त्याचं पुण्य क्षीण होत जातं. मी जर परत आलो नाही तर मला सर्व प्रकारची पापं लागतील.'

'तर मग जा. लौकर परत मात्र ये.'

व्याधाने असे सांगताच मृग परत आपल्या आश्रमात गेला. तेथे पोचल्यावर तिघांनीही आपल्या वचनाचा विचार करून बालकांना समजावून, ते तिघेही व्याधाकडे निघाले. ज्येष्ठ मृगी म्हणाली, 'स्वामी, आपणांशिवाय ही बालकं कशी राहतील? मी प्रतिज्ञा करून आले आहे. मला जावंच लागेल. आपण दोघांनी इथं राहावं.' त्यानंतर छोटी मृगी म्हणाली, 'मी तुझी सेविका आहे भगिनी, म्हणून मीच व्याधापाशी जाणार.'

मृग म्हणाला, 'तुम्ही दोघी घरीच राहा. मी जातो व्याधाकडं. शिशूंचं रक्षण माता चांगल्या रीतीनं करील.' त्यावर त्या दोघी म्हणाल्या, 'स्वामी, पतीशिवाय या जीवनाचा धिक्कार असो.' त्यांनी बच्च्यांचे सांत्वन करून त्यांना शेजाऱ्यांच्या स्वाधीन केले व ते तिघे व्याधापाशी आले. त्यांना जाताना पाहून बच्चे त्यांच्या पाठोपाठ निघाले. मातापित्यांची जी गती होईल तीच आपली असे त्यांनी समजले. ते सर्वच येत आहेत पाहून व्याधास अतिशय हर्ष झाला. त्याने धनुष्यावर बाण ओढला. तेव्हा पुन्हा शिवपिंडीवर त्याच्या हातून बिल्वपत्रे गळून पडली. व्याधाचे सारे पाप संपले. त्या दोन मृगी व तो मृग व्याधाला म्हणाले,

'व्याधा, कृपा करून त्वरित आमच्या शरीराचं सार्थक करावं.'

त्यांचे बोलणे ऐकून व्याधास विस्मय वाटला. शिवपूजेने त्याच्या मनात ज्ञानाचा प्रकाश पडू लागला होता. तो मनात म्हणू लागला - 'हे मृग ज्ञानहीन असूनही धन्य आहेत! आपलं शरीर परोपकारात खर्च व्हावं अशी त्यांची केवढी निष्ठा आहे ! आणि मी मनुष्य असूनही जन्मभर पापकर्मच केलं. दुसऱ्यांच्या शरीरास पीडा देऊन स्वतःचं शरीर मी पोसलं. अशा पापानं माझी गती कोणती होईल ? माझ्या जीवनाचा धिक्कार असो-' व्याधाने आपला बाण आवरून धरला व तो मृगांना म्हणाला, 'मृगांनो, तुम्ही सुखानं परत जावं, तुमचं जीवन धन्य आहे.'

व्याधाने असे म्हणताच भगवान शंकर तेथे प्रकट झाले. मोठ्या प्रसन्नतेने ते त्या भिल्लास म्हणाले, 'व्याधा, मी तुझ्यावर प्रसन्न आहे. कोणताही वर माग.' व्याधास शंकराचे दर्शन होताच 'मी सर्व काही मिळविलं' असे समजून तो शिवांच्या चरणांवर पडला. शिव त्याला समजावून म्हणाले, 'व्याधा, ऐक. आजपासून तू शृंगवेरपुरात उत्तम राजधानीचा आश्रय घेऊन दिव्य भोगांचा भोग घेशील. तुझ्या वंशाची वृद्धी होईल. देवही तुझी प्रशंसा करतील. व्याधा, भगवान श्रीरामचंद्र निश्चयानं एके दिवशी तुझ्या घरी येतील. तुझ्याशी मैत्री करतील.'

त्याच वेळी ते सर्व मृग मृगयोनीतून मुक्त होऊन दिव्यधामास विमानात बसून निघून गेले. आणि अर्बुदपर्वतावर शिव व्याधेश्वर या नावाने स्थिर झाले. ते भोग व मोक्ष देणारे आहेत. तो व्याध दिव्य भोग भोगीत राजधानीत राहू लागला. श्रीरामांची कृपा होऊन त्याला शिवांचे सायुज्य प्राप्त झाले. असे हे शिवरात्रीचे व्रत नकळत जरी घडले. तरी भोगमोक्षाची प्राप्ती होते, जाणीवपूर्वक व्रत केले तर केव्हढा लाभ होईल म्हणून सर्वांनी महाशिवरात्रीचे व्रत करावे व संपन्न व्हावे.

卐 卐 卐

# विष्णुसहस्रनाम

# विष्णुसहस्त्रनाम

## सर्व धर्म समन्वयाचे समर्थ साधन

– आचार्य विनोबा भावे

* * *

*यस्य स्मरण-मात्रेण*
*जन्म-संसार-बंधनात्*

*विमुच्यते नमस् तस्मै*
*विष्णवे प्रभविष्णवे*

* * *

**विनोबा**

आ पण विष्णुसहस्त्रनाम म्हणतो, त्यात केवळ पारायणाची गोष्ट आहे. त्यात केवळ 'स्मरणमात्रेण' शुद्धी होते. तशीं तीं सर्व भगवंताचींच नांवें आहेत. शेवटी म्हटलें आहे,

आकाशात् पतितं तोयं
यथा गच्छति सागरम्
सर्व-देव-नमस्कार:
केशवं प्रति गच्छति

ब्राह्मण संध्या करतात त्यात पहिलें नांव 'केशव' हेंच आहे. नामदेवालाहि 'केशव' नांव अत्यंत प्रिय आहे. पंढरपुरच्या विठ्ठलाचें मूळ नांव 'केशव'च आहे. विटेवर उभा आहे म्हणून त्याला विठ्ठल म्हणतात. सारांश 'केशव' नांव प्रसिद्ध आहे. रामनाम तर आहेच. हरिनामहि आहे. 'रामकृष्णहरि' पण रूढ आहे. या सर्व नामांचा जप पण होतच असतो. परंतु एकच नांव हजार वेळा उच्चारल्याने मनुष्याला एखादे वेळीं थकवासुद्धा येऊ शकतो. विविधता असेल तर थकवा येणार नाही. विविध वृक्ष पाहतांना आनंद होतो. त्याचा एक वेगळाच परिणाम होतो. हजार वृक्ष आहेत, पण ते सर्व एकाच प्रकारचे असतील तर पाहून पाहून माणूस थकून जाईल. विष्णुसहस्त्रनामात वेगवेगळीं एक हजार नांवें आहेत – म्हणून त्याच्या पारायणाने थकवा येत

सर्व धर्म व पंथांचा समन्वय साधण्याचे सामर्थ्य विष्णुसहस्त्र-नामात आहे. इस्लाम, यहुदी, पारशी, जैन, बौद्ध अशा सर्व धर्मांना ते आपले वाटू शकते समावून घेऊ शकते कारण त्या सर्व धर्मांची ईश्वरवाचक नावे त्यात आहेत. महाकवी कालिदासापासून संत तुकारामांपर्यंत बहुतेक कवींवर विष्णुसहस्त्रनामाचा परिणाम दिसून येतो.

श्रीसाईबाबांनी लाडका भक्त शामाला विष्णुसहस्त्रनामाची पोथी देऊन रोज वाचत जा, फायदा होईल म्हणून सांगितले होते. साईबाबांनी जे विष्णुसहस्त्रनाम दिले ते आहे तरी काय ? त्याचे सामर्थ्य काय ? हे साईभक्तांना समजावे म्हणून संत विनोबा भावेंचे त्यावरील एक प्रवचन येथे दिलेले आहे.

नाही. त्यात चिंतन-मननाची अपेक्षा नाही. कुणी त्याचें चिंतन-मनन करील तर त्याचाहि लाभ आहे आणि चिंतन-मनन न करता केवल पारायण करील तर त्याचाहि लाभ आहे.

शंकराचार्यांनी अनेक भाष्ये लिहिलीं. त्यांची 'प्रस्थानत्रयी' तत्त्वज्ञानाचा आधार आहे. प्रस्थान म्हणजे आधार. तिपाईचे तीन पाय असतात तसें हें तत्त्वज्ञानाचें तीन आधार आहेत. **गीता, ब्रह्मसूत्र** आणि **उपनिषद**. ब्रह्मसूत्र आणि उपनिषद विद्वद्‌जनांसाठी आहेत. ब्रह्मसूत्रावरील शंकराचार्यांचें भाष्य वाचून शंकांचे समाधान होते. परंतु शंकाशीलाच्या शंकांचें समाधान करण्याचें सामर्थ्य त्यात आहे, तसें शंकाशून्य भक्ताच्या मनात शंका निर्माण करण्याचें सामर्थ्यहि त्यात आहे. शंकराचार्यांनी अनेक भाष्ये लिहिलीं. पण शेवटीं सामान्य जनांसाठी स्तोत्रें लिहिलीं त्यांत काय म्हटलें ? गेयं गीता नाम-सहस्त्रम् म्हटलें. प्राचीनकाळीं **'सहस्त्रनाम'** म्हणत नसत, **'नाम-सहस्त्र'** म्हणत. लहानपणीं मी 'गेयं गीता-नामसहस्त्रम्' वाचलें तेव्हा मला त्याचा हा अर्थ माहीत नव्हता. गीतेचेंच नांव हजार वेळा घ्यायचें असा त्याचा अर्थ मी समजलो होतो. पुढे संस्कृतचें ज्ञान झालें तेव्हा खरा अर्थ ध्यानात आला. शंकराचार्य महान् ज्ञानी, परंतु सामान्यजनांशी बोलण्याचा प्रसंग आला, तेव्हा त्यांनी गीता आणि विष्णुसहस्त्रनामच सांगितले. असें कां केलें ? कारण लोकांमध्ये भक्ति भावना असते ती भक्तिभावना दृढ करायची असते. सामान्य लोकांसाठी परमार्थाचें हेंच साधन आहे. त्यांच्या डोक्यावर ज्ञान लादून हें करता येत नाही. तुकारामाने म्हटलें आहे, 'ही हजार नांवे, आमची हजार हत्यारें आहेत'. त्यांनी आपल्या कन्येचे लगीन लावले तेव्हा जावयाला हुंड्याच्या रूपात काय दिलें ? आपल्या हाताने लिहिलेली विष्णुसहस्त्रनामाची पोथी दिली.

विष्णुसहस्त्रनामाचें पारायण करण्यानेंच लाभ होतो.

पारायणात जो लाभ आहे तो त्याचा 'प्रगट' लाभ तर आहेच. परंतु मुख्य लाभ आहे तो 'गूढ' लाभ आहे. प्रगट लाभ हा की, त्याने वाणी जरा स्वच्छ होते, वाचणें येतें आणि गूढ लाभ हा की, पारायणात स्नान होऊन जातें. नदीत स्नान केल्याने आपादमस्तक, सारें शरीर थंड होतें, तसेंच या पारायणाने होतें.

**समन्वयात्मक रचना**

शंकराचार्यांनी भक्तांसाठी विष्णुसहस्त्रनामाची खास शिफारस केली आहे. त्याचें एक कारण हें की, तें सर्वसंग्राहक आहे. हिंदुस्थानात जितके पंथ आहेत त्या सर्वांकडे विष्णुसहस्त्रनाम समान दृष्टीने पाहते. त्या सर्वांमधे अविरोध निर्माण व्हावा, त्यांच्यात एकता असावी, समन्वय व्हावा अशी शक्ति 'विष्णुसहस्त्रनामात' आहे. विष्णूचीं हजार नांवें आहेत, म्हणून वैष्णवांचे समाधान होतें; **शिव, स्थाणु** अशीं भगवान शंकराचीं नांवें त्यात आहेत म्हणून शैवांचे समाधान झालें. **सिद्धार्थ** हें गौतम बुद्धाचें नांव आहे तेव्हा त्यात बौद्धाचा उल्लेख येऊन गेला. **वर्धमान** हें महावीरांचे नांव आहे तेव्हा जैनांचा संग्रह झाला. स्कंद म्हणजे कार्तिकस्वामी, त्यांचा एक स्वतंत्र पंथ आहे. त्या काळीं सूर्याची भक्ति करणारे लोक होते. सूर्याचा उल्लेख विष्णुसहस्त्रनामात अनेक वेळा आला आहे. अग्नीचें नांवहि आहे. त्याने अग्निपूजकांचें समाधान होतें. विनायक-गणपतीचाहि उल्लेख आहे- ज्योतिर्गणेश्वर...शंकराचार्यांनी 'तारकांचा ईश्वर' अशी याची व्याख्या केली आहे. परंतु ज्योतिः, गणेश्वरः अशीं वेगवेगळीं नांवें घेतली तर गणेश्वर म्हणजे गणपति, विनायक असा अर्थ होतो. अशा प्रकारें भिन्न-भिन्न धर्म-पंथांचा उल्लेख त्यात आहे.

यावर कुणी विचारील, 'विष्णुसहस्त्रनाम' इतके प्राचीन आहे तर त्यात गौतम बुद्धाचें नांव कसें आलें ? 'विष्णुसहस्त्रनाम' महाभारतात आलें आहे, म्हणजे पांच हजार वर्षे जुनें आहे आणि गौतम बुद्ध तर फक्त अडीच हजार वर्षांपूर्वीचा आहे तर हें कसें ? उत्तर असें : शब्द प्राचीन आहे. आपण 'राम' म्हणतो. हा 'राम' कोण ? दाशरथी राम तर आहेच, परंतु भार्गवी रामहि आहे, परशुराम आहे. नंतर बलरामहि आला आणि येथे आपला रामभाऊ (म्हसकर) हि आहे, तेव्हा रामभाऊपासून परशुरामापर्यंत शब्द चालला. त्याचा अर्थ 'राम' शब्द फार प्राचीन आहे. सर्वांच्या अंतरांत जो 'राम' आहे, त्याचें नांव दशरथाने आपल्या मुलाला ठेवलें. त्याचप्रमाणे सिद्धार्थ नांव पण. गौतम बुद्धाचें त्याच्या वडिलांनी जें नांव ठेवलें, तो प्राचीन काळापासून चालत आलेला शब्द होता. शब्द प्राचीन आहे. अशा तऱ्हेने सगळ्या पंथांची नांवें विष्णुसहस्त्रनामात येऊन जातात. त्या काळीं जे वाद होते, झगडे होते, पंथ होते, ते सर्व विष्णुसहस्त्रनामात विरून गेले; असा त्याचा परिणाम झाला.

विष्णुसहस्त्रनाम प्राचीन ग्रंथ आहे. एका द्रष्ट्याचा ग्रंथ आहे. सर्व धर्मांचे सार त्यात आहे. इस्लाम काय म्हणतो ? **अल्लाहुनुरूस्समावाति वल् अरद्** – अल्लाह प्रकाश आहे आकाशाचा आणि भूमीचा. विष्णुसहस्त्रनामात पहा, **प्रकाशात्मा, प्रतापनः** (प्रकाश देणारा, तापवणारा) म्हटलें आहे. **अल्लाहुनुरूस्समावाति** मधे त्यांना जें म्हणायचें आहे, तेंच **प्रकाशात्मा प्रतापनः** मध्ये मिळेल. मग **अल्मलिकु**– भगवान मालक आहे विष्णुसहस्त्रनामात आहे, **लोकस्वामी त्रिलोकधृक्** - तीन लोकांना धारण करणारा, तीन लोकांचा स्वामी. अल्मलिकुचाच हा अर्थ आहे. अर्थतः दोन्ही शब्द एकच आहेत. आता कुणी जर अशी अपेक्षा करील की, 'अल्मलिकु' शब्दच विष्णुसहस्त्रनामात आला पाहिजे तर ते अनुचित ठरेल. कुराणामधे आणखी एक नांव आहे, **कुद्दुसु** म्हणजे शुभ, पवित्र, **सलाम** म्हणजे शांति. विष्णुसहस्त्रनामात आहे, **शुभांगः, शांतिदः.** यात **कुद्दुसुहि** आलें आणि **सलामहि** आलें. इस्लामचें एक अत्यंत प्रसिद्ध नांव आहे, गफ्फार. गफ्फार म्हणजे क्षमिणांवरः, म्हणजे अत्यंत क्षमा करणारा. मामुली क्षमा नाही, अत्यंत क्षमा. गफ्फारचा संस्कृत अनुवाद करायचा झाला तर तो क्षमिणांवरःच होईल. हा विष्णुसहस्त्रनामाचा शब्द आहे. इस्लाममधे परमेश्वराचीं ९९ नांवें मानली गेलीं आहेत. अर्थतः विचार केला तर, त्यातील (इस्लामच्या नांवातील) बहुतेक सर्व नामें आपल्याला विष्णुसहस्त्रनामात मिळतील.




मी पूर्वी असेंहि म्हटलें होतें की, क्रिश्चियानिटीमधे ट्रिनिटी (त्रि-तत्त्व) ची कल्पना आहे, ती विष्णुसहस्त्रनामातहि आहे. ईसाई धर्माचें लोक मानतात की, विश्वात ट्रिनिटी आहे, ईसामसीह, पवित्र आत्मा आणि परमात्मा. तेंच विष्णुसहस्त्रनामात आहे. **'पूतात्मा परमात्मा च मुक्तानां परमागतिः'** । ईसाई लोकांची ट्रिनिटी यात येऊन जाते.

यहुदी लोकांचा शब्द आहे, यह्व. यह्व म्हणजे अत्यंत बलशाली, समर्थ. **महाबुद्धिः महावीर्यः महाशक्ति महाद्युतिः** या सर्वात यह्व शब्दाचा अर्थ येऊन जातो. **यह्व** आणि **शक्तिः** एकच आहे.

पारशांचा शब्द आहे, मज्द. मज्द जो असतो तो महान् असतो. महत्चा मज्द (शब्द) बनला. हें फारशी रूप आहे. वेदात महत् शब्द आला आहे, **महत् देवानां असुरत्वमेकम्** सर्व देवांमधे एक परमेश्वर महान् आहे. असुर म्हणजे राक्षस नाही, असुर म्हणजे परमेश्वर. पारशांचीं नांवें आहेत, **अहुरा, मज्दा,** महान् परमेश्वर. विष्णुसहस्त्रनामात आहे, **गुणभृन् निर्गुणो महान्.** सर्व गुणांचें धारण करणारा, त्या गुणांहून पलीकडचा, महान् !

हें वर्णन कुठल्याहि पारशी आणि यहुदी लोकांना ऐकवलें तर ते याचा सहज स्वीकार करतील.

हीं उदाहरणें मी यासाठी दिलीत की, विष्णुसहस्त्रनामात सर्व धर्मांचा समन्वय करण्याचें पूर्ण सामर्थ्य आहे हें ध्यानात यावें. म्हणून माझी 'विष्णुसहस्त्रनामा'वर अपार श्रद्धा आहे. निरनिराळे अर्थ यातून निघू शकतात.

संस्कृत भाषेत हें सामर्थ्य आहे. संस्कृत शब्द जितका रस खेंचला जाऊ शकतो तितका खेंचून घेतो. कृष्ण शब्दाचा अर्थ 'देवकीचा मुलगा' असा केला तर तो चूक होईल. कृष्ण म्हणजे प्रेमाने आकर्षण करणारा. त्यात 'कृष्' (खेंचणें) धातु आहे. 'राम' शब्दाचा अर्थ 'दशरथाचा मुलगा' असा करणें चूक होईल राम म्हणजे सर्वांच्या हृदयात रमणारा, सत्यस्वरूप, अधिष्ठानरूप परमात्मा. 'हरि' म्हणजे दुःखाचें हरण करणारा, कल्याणमय, प्रेममय कृष्ण, सत्यमय राम, करूणामय हरि. असा अर्थ आपण करू तर आपण बरोबर अर्थ केला, भगवान व्यासांच्या कल्पनेला अनुरूप अर्थ आपण केला, असें होईल.

## कवींवर परिणाम

मी पुष्कळ वेळा सांगितलें आहे, विष्णुसहस्त्रनाम हजारों वर्षांपासून घोटलेलें आहे. होमिओपथीचें औषध घोटलेलें असतें, जितकें जास्त घोटलेलें तितकी त्याची पोटेन्सी (शक्ति) अधिक मानली जाईल. तशीच् विष्णुसहस्त्रनामाची पोटेन्सी प्राचीनकाळापासून आजपर्यंत नित्य वाढत आली आहे.

विष्णुसहस्त्रनामात त्याच्या पूर्वीच्या ग्रंथातून नावें घेतली आहेत हें तर स्पष्टच आहे. त्याच्या आधीचे ग्रंथ म्हणजे वेद, उपनिषद आहेत. वेद-उपनिषदांत जीं परमेश्वराची नावें आहेत, ती विष्णुसहस्त्रनामात येतात. **अन्न अन्नाद एवच ।** विष्णुसहस्त्रनामात हें आलें आहे. अहमन्नं, अहमन्नम्। अहमन्नाद: अहमन्नाद: अहमन्नाद:, तैत्तीरीयउपनिषददात हें आहे. 'मी अन्न आहे, मी अन्न आहे. मी अन्न खाणारा आहे, मी अन्न खाणारा आहे, मी अन्न खाणारा आहे.'' त्यावरूनच घेतले आहे, **अन्नं अन्नाद एवच ।**

वेद-उपनिषदाचा लाभ होऊन त्यांतून नांवे घेतली, यात आश्यचर्य नाही. कारण विष्णुसहस्त्रनाम हें त्यानंतर झालेलें आहे. विष्णुसहस्त्रनामाचा परिणाम कोणावर झाला हें पाहण्यात आम्हाला मजा वाटते. संस्कृतातला क्वचितच कोणी संत असेल ज्याच्यासमोर विष्णुसहस्त्रनाम नसेल आणि त्याने त्यातील एखादा शब्द घेतला नसेल.

तुकारामाने म्हटलें, ''तू आमुच्या जीवांचे जीवन। अमृताची तनु।'' यात 'अमृताची तनु म्हटलें तें विष्णुसहस्त्रनामात आहे, **अमृताश: अमृतवपु:।** अमृतवपु: चा अनुवाद करून 'अमृताची तनु' म्हणून टाकलें. ज्ञानदेव म्हणतात 'अनंत वेषे अनंत रूपें देखिले तयासि।' **अनंतरूपो अनंतश्री:** विष्णुसहस्त्रनामातील नाम! अशा तऱ्हेने संतांनी त्याचा उपयोग केला.

कवि कालिदास **रघुवंश** लिहितात. ''रघूंचा महान् वंश! इतका उंच वंश! मी इतका ठेंगणा, लहान-सा मनुष्य आणि तो वृक्ष इतका उंच आहे! ठेंगणा मनुष्य आणि तो वृक्ष इतका उंच आहे! ठेंगण्या मनुष्याच्या हातीं त्या उंच वृक्षांचें फळ येणार नाही. कोणी ठेंगणा मनुष्य उंच वृक्षाचे फळ घ्यायला जाईल तर ते कसें हास्यास्पद होईल.'' विष्णुसहस्त्रनामात **उपेंद्रो वामन: प्रांशु:** अशी दोन परस्पर-विरोधी नांवे आहेत. यातून **प्रांशु:** आणि **वामन:** उचलून कालिदासाने काव्य बनवलें.

**अमानी मानदो मान्य:** हे विष्णुसहस्त्रनामाचें नाम! अमान-स्वत:साठी मान इच्छित नाहीत. परंतु मानदा-दुसऱ्यांना मान देतो. लहान मुलगा कसा असतो? त्याला स्वत:ला मान नसतो. तो सरळ मनाचा आहे आणि तो दुसऱ्यांनाही मान देत नाही. परंतु इथे तसें नाही. इथे लहान मुलगा नाही, त्याला स्वत:ला मान नाही, परंतु मोठा असून दुसऱ्यांना नेहमी मान देतो, प्रौढासारखा. असें दोन गुण त्याच्यात असतील. चैतन्य महाप्रभु म्हणतात, नेहमी हरिकीर्तन करणे चांगलले वाटतें, तर कसें रहावे?

**तृणादपि सुनाचेन ।**
**तरोरिव सहिष्णुना ।**
**अमानि यानदेन कीर्तनीय: सदा हरि:**

स्वत:तृणाहूनहि लहान समजावें, वृक्षासारखे सहिष्णु असावे, आपल्याला स्वत: मान, सन्मान नसो; दुसऱ्याला नेहमी मान सन्मान द्यावा आणि नेहमी हरीचें कीर्तन करावें. या एका श्लोकात चैतन्यमहाप्रभूंचा पूर्ण विचार येऊन गेला आहे.

अशा प्रकारे, भारताच्या संतांवर आणि कवींवर विष्णुसहस्त्रनामाचा परिणाम झाला आहे.

卐 卐 卐

## भजनांजली

भजावे नित्य गुरू-साईनाथ भजावे
समोर असावी सुंदर मुर्ती
गुलाब अत्तर उदी सुगंधी
टाळ मृदुंग खंजीरी नादा - तन्मय होई प्राण (१)

नाद स्वप्नी घुमले मंदीर
मन स्थीर झाले पहा प्रफुल्लीत
अंतर्आत्मा हा बोलवित निर्गुण भजीत ध्यान (२)

निरंजनी ही शुद्ध तुपाची
ओवाळीते दिव्य तेज ज्योती
मंद्र अक्षदा घेऊन गर्जू ठेवा मज सुखधाम (३)

**- के. एल. जोशी**
(जळगांव)



# श्रीकृष्णासारखे अनासक्त व्हा

– स्वामी विवेकानंद

**स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचे निमित्त साधून या अंकात आम्ही स्वामीजींच्या प्रवचनातील काही भाग येथे देत आहोत. स्वामीजी म्हणतात – वृंदावनात मुरली वाजविणाऱ्या कृष्णाला स्वीकारून चालणार नाही तर गीतारूपी सिंहनाद करणाऱ्या श्रीकृष्णाची पूजाच तुम्हाला शक्तीसंपन्न बनवू शकेल.**

गीतेचे मूळ नायक भगवान श्रीकृष्ण होत. तुम्ही खिस्ती लोक ज्याप्रमाणे नॅझारेथनिवासी येशूना ईश्वराचे अवतार मानून त्यांची उपासना करीत असतात, त्याचप्रमाणे हिंदु लोक ईश्वराचे अनेक अवतार मानून त्यांची पूजा करीत असतात. अवतारांसंबंधी हिंदु लोकांचा असा विश्वास आहे की, जगाच्या प्रयोजनानुसार धर्माचे रक्षण आणि अधर्माचा विनाश करण्यासाठी भगवान वेळोवेळी अवतार धारण करून ही पृथ्वी पुनीत करीत असतात. भारतातील अनेक धर्मपंथात एकेका अवताराची उपासना प्रचलित आहे. कृष्णांच्याउपासकांचा एक स्वतंत्र संप्रदायहि आहे. इतर अवतारांच्या उपासकांपेक्षा भारतात बहुधा कृष्णोपासकांचीच संख्या अधिक असावी. कृष्णाच्या भक्तांचे म्हणणे आहे की, कृष्णच सर्व अवतारांमधे श्रेष्ठ आहेत-कृष्ण पूर्णावतार आहेत. या त्यांच्या विधानाचे कारण विचारल्यास ते म्हणतात की, बुद्ध व इतर अवतारांचे जीवितकार्य लक्षांत घ्या. ते सर्व सन्यासी होते. गृहस्थांच्या सुखदुःखाविषयी त्यांच्या हृदयांत सहानुभूति नव्हती. आणि असणार तरी कशी ? परंतु श्रीकृष्णाचे जीवन बघा-पुत्राच्या म्हणा, मित्राच्या म्हणा की राजाच्या म्हणा, सर्वांच्याच भूमिकांचा आदर्श त्यांच्या चरित्रांत आढळून येतो. आणि ते ज्या अपूर्व उपदेशांचा प्रचार करून गेले आहेत, त्यांचे साऱ्या जन्मभर स्वतः प्रत्यक्ष आचरण करून दाखवून त्यांनी जीवांना उद्धाराचा मार्ग दाखवून दिला आहे. श्रीकृष्ण सांगून गेले आहेत-

**''कर्मण्यकर्म यः पश्येत्, अकर्मणि च कर्म यः**
**स बुद्धिमान् मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत् ॥''**

''जो निरंतर कर्मशील असूनहि नैष्कर्म्याची मधुर शांति अनुभवीत असतो, आणि जो परत निःस्तब्धतेमधेहि अत्यंत

कर्मशील असतो, त्यालाच जीवनाचे रहस्य यथार्थपणे कळले आहे.''

आणि हा आपला उपदेश प्रत्यक्ष कृतीत कसा आणता येईल हेहि श्रीकृष्णाने दाखवून दिले आहे. ह्याचा उपाय आहे-अनासक्ति ! सर्व कर्म करा, परंतु कशातहि स्वतःला गुरफटून घेऊ नका-कशावरहि आसक्त होऊ नका. तुम्ही स्वरूपतः शुद्ध-बुद्ध-मुक्त साक्षिस्वरूप आत्मा आहात. त्या तुमच्या स्वरूपाचा लोप कधीहि झालेला नाही. कधी होणार नाही. **आपल्या दुःखाचे कारण कर्म नव्हे, आसक्तिच आपल्या दुःखाचे कारण होय.** दुष्टान्तादाखल धनाचीच गोष्ट घ्या. धनवान होणे फार चांगले आहे. परंतु या बाबतीत कृष्णांचा उपदेश हा असा आहे की, अर्थोपार्जन करा, पैशासाठी प्राण पणास लावून प्रयत्न करा, परंतु त्यावर आसक्त होऊ नका. पति-पत्नी, पुत्र-कन्या, आप्तेष्ट, मान-यश वगैरे सर्व बाबतीत हा उपदेश सारखाच लागू आहे. **तुम्ही या साऱ्यांचा त्याग करण्याचे कारण नाही, आवश्यकताहि नाही. फक्त इतके मात्र लक्षात ठेवा की, त्यांवर कदापि आसक्त होऊन बसू नका.** आपल्या आसक्तीला वा अनुरागाला पात्र आहे केवळ एकचजण, आणि तो म्हणजे-स्वयं भगवान. इतर कुणाहि नाही. स्वजनांकरिता कर्म करा, त्यांच्यावर प्रेम करा, त्यांचे हित साधण्याचा प्रयत्न करा. आणि गरज पडेल तर त्यांच्यावरून एका नव्हे, शंभर जीवनांचे लिंबलोण उतरून ठेवा. परंतु कधीहि त्यांच्यावर आसक्त मात्र होऊ नका. भगवान श्रीकृष्णाचे स्वतःचे जीवन या उपदेशाचे जाज्वल्य उदाहरण होते.

बंधूंनो, ज्या ग्रंथात श्रीकृष्णाचे चरित्र वर्णिलेले आहे तो कैक हजार वर्षापूर्वीचा जुना ग्रंथ आहे. आणि तरीहि लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही की, **त्यांच्या जीवनाशी काही बाबतीत नॅझारेथनिवासी येशूंच्या जीवनाचे बरेचसे साम्य आहे.** श्रीकृष्ण राजवंशात जन्मास आले होते. त्या समयीं कंस नावाचा एक अत्याचारी राजा जन्मास आले होते. या समयी कंस नावाचा एक अत्याचारी राजा राज्य करीत होता. या कंसाला अशी एक आकाशवाणी ऐकू आली होती की, लवकरच त्याचा संहारकर्ता जन्मास येणार आहे. ती वाणी ऐकून त्या दुष्टाने एकूणएक सर्व कोवळ्या अर्भकांची हत्या करण्याचा आपल्या भृत्यांना आदेश दिला. कृष्णाचे आईवडीलहि कंसाने बंदीत ठेवले होते. आणि त्या बंदिवासांतच कृष्णाचा जन्म झाला. कृष्णाचा जन्म झाला त्या क्षणी ते समस्त कारागार एका दिव्य ज्योतीने प्रकाशित होऊन गेले. त्या क्षणी ते बालक (श्रीकृष्ण) म्हणाले,''मीच समस्त जगाची ज्योति आहे. जगाच्या कल्याणार्थ मी अवतीर्ण झालो आहे.''श्रीकृष्णाचे 'गायी चारणारे' असेहि वर्णन केले गेले आहे-त्यांचे 'गोपाल' असेहि एक नाव आहे. काही ऋषींनी दुरुनच अंतर्ज्ञानाने जाणले की साक्षात् परमेश्वर नरदेह धारण करून श्रीकृष्णाच्या रूपाने पृथ्वीवर अवतरले आहेत, आणि हे जाणून ते त्या लीलामानवाची पूजा करण्यासाठी तिथे येऊन उपस्थित झाले. बायबलांतील येशूच्या चरित्रांतहि असल्याच एका घटनेचा उल्लेख आढळतो. तत्कालीन हेरॉड राजानेहि अशीच एक देववाणी ऐकून सर्रास (शिशुहत्येचा) आदेश दिला होता. येशूचे आईवडील प्रवासांत असतानाच बेथलेहेम नामक जागी एका पागेत येशूचा जन्म झाला. येशूना रूपकाच्या भाषेत Shepherd किंवा 'मेंढपाळ' म्हणण्यात येते. बालक येशूंच्या रूपाने परमेश्वर जन्मले आहेत हे दैवी उपायाने जाणून पूर्वेकडचे काही ज्ञानी पुरुष त्या दैवी बालकाच्या दर्शनासाठी तिथे गेले होते. कृष्ण व येशू यांच्या जीवनातील कित्येक घटनांत याप्रमाणे सादृश्य असलेले दिसून येते. परंतु उभयतांच्या जीवनलीलेतील इतर भागात मात्र हे सादृश्य आढळत नाही.

ते कसेंहि असो, कृष्णांनी त्या अत्याचारी कंसाचा निःपात केला खरा, परंतु स्वतः त्या रिकाम्या सिंहासनावर आरुढ होण्याची कल्पनादेखील त्यांच्या मनाला शिवली नाही. आपले कर्तव्य म्हणूनच त्यांनी ते कार्य केले होते. त्यांच्या फलाचा, त्याचे स्वतःचा कोणता स्वार्थ साधू शकेल यांचा विचारहि त्यांच्या चित्तात उद्भवला नाही.

कोणत्याही दृष्टीने पहा, भगवान श्रीकृष्णाचे जीवन सर्वत्र परिपूर्ण आहे. ज्ञान, कर्म, भक्ती, योग या साऱ्यांची ते जणू साकार मूर्तिच होते. श्रीकृष्णचरित्राचा आज अधिक विचार व्हावयास हवा. वृंदावनात मुरली वाजविणाऱ्या कृष्णालाच केवळ स्वीकारून आज चालणार नाही, त्याने जीवांचा उद्धार होणार नाही. **आज अत्यावश्यक आहे गीतारूपी सिंहनाद करणाऱ्या श्रीकृष्णाची पूजा, धनुर्धारी राम, महावीर हनुमान, कालीमाता यांची पूजा ! तेव्हाच कुठे लोक मोठ्या उत्साहाने कर्म करून शक्तिसंपन्न होतील.** खूप विचाराअंती अखेर माझे तर मत झाले आहे की जे लोक या देशात आज धर्म धर्म करून आरडाओरड करतात, त्यांच्यातील बरेचसे आहेत विकृत, डोक्याचे हलके आणि धर्मान्ध. अत्यंतिक रजोगुणाची कास धरल्याखेरील तुम्हांला आता ना इहलोकाची आशा, ना परलोकाची. सारा देश तमोगुणाने कुंद होऊन गेला आहे.

卐 卐 卐

घट घट में वो ही साई रमता

# संत कबीरांची प्रेमदृष्टी

प्रा. टी. के. जाधव



पोथ्यांच्या ढीगांमध्ये हरवून बसण्यापेक्षा 'प्रेम' हा एकच अडीच अक्षरांचा शब्द सर्वांनी प्रथम समजून घ्यावा. प्रेम हीच ईश्वरभक्ती असून त्यापेक्षा वेगळे पांडित्य ईशप्राप्तीसाठी गरजतेचे नाही असे सांगणारे संत कबीर उत्तरेतील एक महान संत होऊन गेले. श्री साईबाबांना कबीर अवतार म्हणतात. त्यादृष्टिने श्री साईचे मोठेपण समजण्यास संत कबीर आपणास माहित पाहिजेत. प्रा. टी. के. जाधव हे हिंदीचे नामवंत प्राध्यापक व हिंदी संत साहित्याचे अभ्यासक आहेत. त्यांनी करून दिलेला कबीर वाङमयाचा परिचय -

'अरे, इन दोऊन राह न पाई ।
हिंदून की हिंदूआई देखी, तुरकन की तुरकाई ।।'

'हिंदू असो की मुस्लिम-दोघांनाही खरा मार्ग सापडला नाही हेच खरं .... अहो, मी हिंदूचं हिंदूत्वही पाहिलं आणि मुस्लिमाचं मुस्लिमत्वही पारखलं. सत्यापासून दोघंही दूरच असल्याचं जाणवलं ....'

संत कबीरांनी तत्कालीन धार्मिक स्थितीबद्दल छातीठोकपणे केलेलं हे वक्तव्य आजही आपल्याला अंतर्मुख करणार नाही का?

संत कबीरांचं व्यक्तिमत्व, कतृत्व आणि त्यांनी निर्माण केलेलं साहित्य आजच्या काळाचीही गरज ठरू शकतं असं म्हटल्यास चुकीचं ठरणार नाही.

संवत १४५५ ते १५७५ हा कबीरांचा जीवन काळ मानला जातो. मुसलमान 'जुलाहा' जातीत जन्मूनही ते संस्काराने नाथ संप्रदायातील अद्वैत चिंतन व योग साधनेनेच भारले गेले. सुफी

पंथातील अद्वैत प्रेम भक्तीचाही त्यांनी पुरस्कार केला होता ...' हरी को भजै, सो हरी का होय' असं जातीधर्मनिरपेक्ष मत प्रतिपादीत करणाऱ्या स्वामी रामानंदाचं शिष्यत्व त्यांनी स्वीकारलं होतं. या सर्व संस्कारांचं बळ घेऊनच, चोहीकडे आढळून येणाऱ्या धार्मिक संकुचित रुढी परंपरांना पायदळी तुडवून एका समर्थ तत्त्वज्ञानाची सर्व समावेशक मानवतावादी ध्वजा त्यांनी आंतरिक तळमळीतून उभारली होती.

हिंदी साहित्यातील प्रसिद्ध समीक्षक डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी यांच्या शब्दात सांगायचं झाल्यास पुढील अवतरण मननीय वाटतं .... 'युगपुरुषाची शक्ती आणि विश्वास घेऊनच कबीर अवतरले होते. युगप्रवर्तकाची दृढताही त्यांच्या व्यक्तिमत्त्वात विद्यमान होती. म्हणूनच ते युगप्रवर्तन करू शकले.'

कबीरदासांच समग्र साहित्य स्वानुभूतीच्या रसरसीतपणातून अवतरलं आहे. म्हणूनच की काय ते सुशिक्षित पुस्तकी किड्यांना खडसावून सांगतात.

**'तू कहता कागज की लेखी ।**
**मै कहता अखियन की देखी ॥'**

पुस्तकात काय लिहिलेलं आहे तेच तुम्ही सांगता. पण मी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेलं मनाने अनुभवलेलं सांगतो. माझ्यात आणि तुमच्यात फरक हा असणारचं. पुस्तकी पोपटपंची करायला मी काही तुमच्यासारखा साक्षर नाही.

**'मसि कागज छुओ नही ।**
**कलम गही नही हाथ ॥'**

कागद आणि शाई कशाला म्हणतात तेही मला माहीत नाही आणि लेखणीला मी स्पर्शही केला नाही.'

अशी कबुली स्वत: कबीरांनीच दिली आहे... असं असलं तरी त्यांचं वाङमय पाठांतराच्या रुपानं व त्यानंतर पुस्तकांच्या रूपानं जोपासलं गेलं आणि आज हिंदी साहित्याचा अमूल्य ठेवा ठरलं आहे.

चरितार्थासाठी हाताने विणता विणताच मनाच्या हातांनी सुंदर सुंदर पदंही ते आयुष्यभर गुंफत राहिले. सामाजिक विषमतेवर कठोर आघात करीत राहिले.

**'जौ तू ब्राह्मण ब्राह्मणी जाया,**
**और राहसे क्यो न आया**
**जौ तू तुरक तुरकनी जाया,**
**भीतर खतना क्यों न कराया ॥**

॥ 'कहत कबीरा' ॥

'जिन ढुँढा तिन पाइया,
गहरे पानी पैठ ।
मैं बपूरा, डुबन डरा,
रहा किनारे बैठ ॥'

* * *

'निर्गुण की करो सेवा
सगुण का करो ध्यान ।'

तत्कालीन कर्मठ धर्ममार्तंडावर टीका करताना कबीरांनी उच्चवर्णीयांना विचारलंय - ''तुझा जन्म विटाळातून कसा झाला?... कारे बाबा ! तू स्वत:ला श्रेष्ठ समजतोस तर तू दुसऱ्या मार्गाने का नाही आलास?''

हाच सडेतोड सवाल ते मुस्लिमांनाही टाकतात 'हे मुल्ला मौलवींनो ! तुम्ही जर खरे 'तुरक' होता तर मातेच्या उदरात 'खतना' का करून घेतली नाही.

## ॥ भेदाभेदावर प्रहार ॥

धर्माचे परंपरागत वर्तनप्रकार निव्वळ थोतांड व ढोंगबाजीचे असून ते पूर्णपणे वरवरचे आहेत. पृथ्वीतलावर जन्म घेणारा प्रत्येक माणूस सारखाच! भेदभाव करण्याचं काहीही कारण नाही. हे सत्य संत कबीरांनी किती कौशल्यानं तर्कनिष्ठ युक्तिवादानं सिद्ध केलं आहे.

**'विष्णूमय जग वैष्णवाचा धर्म**
**भेदाभेद भ्रम अमंगळ ॥**

संत तुकाराम महाराजांच्या तत्त्वज्ञानाप्रमाणेच कबीरांनी समानतेचा संदेश दिला आहे. ईश्वराची सर्वात्मक सत्ता सर्व संतांप्रमाणे कबीरांनाही मान्य होती म्हणून ते म्हणतात,

**'घट घट में वो ही साई रमता ।**
**कटु वचन मत बोल रे ॥'**

'प्रत्येक देहात तोच एक ईश्वर विलसत आहे. कुणाशीही कटू व्यवहार करू नका पण हेच सत्य अज्ञजनांना कळत नाही म्हणूनच कबीर म्हणतात -

**'कस्तुरी तो कुण्डिल बसै ।**
**मृग ढुँढै वन माहि ।**
**ऐसे घट घट राम है,**
**दुनिया देखै नाही ॥'**

'कस्तुरी तर हरणाच्या पोटातच असते ... पण हरिण मात्र तिच्याच शोधत वेडंपिस होऊन 'वन वन' भटकत असते. हीच अवस्था माणसाची. देवदेहात असुनही आपण व्यर्थच त्याचा शोध घेत तीर्थक्षेत्रात फिरत राहतो. देहातल्या दवाचा बोध न घेता त्याचा व्यर्थ शोध घेणाऱ्या माणसाला हरिणाची उपमा देऊन कबीरांनी किती प्रभावी विचार मांडलाय! हा दोहा वाचताच -